# महाराष्ट्र विधानपरिषद

## चौथे (हिवाळी) अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### पनवेल (जि.रायगड) येथे आर्थिक विकास केंद्र उभारण्याबाबत

**(१) ४८२७ (१३-११-२०२०) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) जवळील हिंदुस्तान ऑर्गेनिक केमिकल व भारत पेट्रोलियम या कंपन्यांच्या ४३१ एकर जागेवर नविन आर्थिक विकास केंद्र उभारणीस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने माहे मे, २०२० मध्ये मान्यता दिली असल्याचे दिनांक ३० ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९-२०२० च्या रेडीरेकनरच्या दरानुसार ९६३ कोटी ३० लाख १३ हजार ६०० रुपये इतक्या खर्चास मान्यता देऊन सदर जागा “जैसे थे तत्वावर” खरेदी करण्यास मान्यता दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागा ताब्यात मिळण्यासाठी भारतीय अवकाश संशोधन संस्था (ISRO) व भारत पेट्रोलियम कंपनी यांचेकडून शासनास ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले नसल्यास सदर प्रमाणपत्र मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच संबंधितांकडून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास नकार मिळाल्यास आर्थिक विकास केंद्र उभारणीकरीता पर्यायी नियोजन काय आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-१२-२०२०)** : (१) होय.
(२) नाही, मे.हिंदुस्तान ऑर्गेनिक केमिकल लिमिटेड यांचे जमिनीवर नविन आर्थिक विकास केंद्र उभारणीस एमएमआरडीच्या दिनांक ०७ जुलै, २०२० रोजी झालेल्या १४९ व्या बैठकीत, सन २०१९-२०२० च्या रेडीरेकनरच्या दरानुसार ९६३ कोटी ३० लाख १३ हजार ६०० रूपये इतक्या खर्चास मान्यता देऊन सदर जागेवर अतिक्रमणे असल्यास त्या जमिनी अतिक्रमण विरहीत करून दिल्यानंतर खरेदी करण्याबाबतच्या ठरावास मान्यता देण्यात आली आहे. तथापि, मे.हिंदुस्तान ऑर्गेनिक केमिकल लिमिटेड ज्या जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित करण्यास असमर्थ आहेत त्या जमिनी “जैसे आहे तैसे” स्थितीत प्राधिकरणास विनामुल्य हस्तांतरीत करण्यात याव्यात असा ठराव केला आहे.
(३) एमएमआरडीने मे.हिंदुस्तान ऑर्गेनिक केमिकल लि. यांना दिनांक ०९/०९/२०२० रोजी सादर केलेल्या स्वारस्य देकारपत्रात नमूद केल्यानुसार केंद्र व राज्य शासनाकडून घेण्यात येणाऱ्या परवानग्या मे.हिंदुस्तान ऑर्गेनिक केमिकल्स लिमिटेड यांनी घ्यावयाच्या आहेत. त्यानुसार भारतीय अवकाश संशोधन संस्था व भारत पेट्रोलियम कंपनी यांचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी मे.हिंदुस्तान ऑर्गेनिक केमिकल्स लिमिटेड यांची आहे.
(४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व हिंदुस्तान ऑर्गेनिक केमिकल यांचेसमवेत समझोता करार करण्याचे नियोजित असून उक्त कराराचा मसुदा मेसर्स हिंदुस्तान ऑर्गेनिक केमिकल्स लि. यांना माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये प्राधिकरणामार्फत सादर करण्यात आला आहे. मे.हिंदुस्तान ऑर्गेनिक केमिकल्स लि. यांचेशी वाटाघाटी करणे, जमिनीची उपयुक्तता व मिळणारे

एकसंध क्षेत्र याचा विचार करून करारनामा करणे, जमिनीचा मोबदला / खरेदी किंमत ठरवणे व अदा करणे तसेच त्यानुषंगिक इतर कार्यवाही करण्यासाठी अतिरिक्त महानगर आयुक्त-२, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडील प्रलंबित प्रकरणाबाबत

**(२) ४८३८ (१३-११-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात धर्मादाय आयुक्त कार्यालयातील प्रलंबित प्रकरणे जलदगतीने मार्गी लावण्यासंदर्भात अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धर्मादाय आयुक्तालय, कोल्हापूर यांच्याकडे सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील किती प्रकरणे प्रलंबित आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्याकरीता कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०३-१२-२०२०) :** (१) होय.

(२) कोल्हापूर, सांगली, सातारा विभागातील ऑक्टोबर, २०२० अखेर एकूण १०५६० प्रकरणे प्रलंबित आहे.

धर्मादाय आयुक्त कार्यालयातील पदांचा आकृतिबंध निश्चित करण्यासाठी प्रस्ताव यापूर्वीच वित्त विभागाकडे पाठविण्यात आला होता. परंतु उच्चस्तरीय समितीने या प्रस्तावाच्या अनुषंगाने काही मुद्दे उपस्थित केले होते. त्या मुद्यांचे निराकरण करून नस्ती वित्त विभागाला आकृतिबंध

निश्चित करण्यासाठी पाठविण्यात आली आहे. तसेच आकृतिबंध अंतिम होईपर्यंत न्यायिक अधिकाऱ्यांमधून सहायक धर्मादाय आयुक्त या संवर्गातील पदे तातडीने प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी मागणी मा.उच्च न्यायालयाकडे करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबई महानगरपालिकेच्या वाशी येथील मैदानाची दुरवस्था झाल्याबाबत

**(३) ४८५५ (१३-११-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या वाशी, सेक्टर १० येथील मैदानाची अत्यंत दुरवस्था झालेली असून आंतरक्रीडा संकुलाची इमारतही विनावापर असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिका उक्त उद्यान व मैदांनाच्या देखभालीकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-१२-२०२०) :** (१), (२) व (३) वाशी, सेक्टर-१०ए, भूखंड क्र. ११ व १२ येथील मैदान सिडकोकडून नवी मुंबई महानगरपालिकेकडे सन २००७ मध्ये हस्तांतरीत करण्यात आलेले आहे.

सदर मैदानाची आवश्यक ती सर्व कामे करण्यात आली असून मैदानाच्या संरक्षक भिंतीच्या रंगरंगोटीचे व मैदानामध्ये माती टाकण्याचे काम करण्यात आलेले असून मैदान सुस्थितीत आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वाशी, सेक्टर-१० येथे आंतरक्रीडा संकुलाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे.

सदर इमारत वापराचे प्रमाणपत्र नगर रचना विभागाकडून प्राप्त करून घेण्याची प्रक्रिया सुरू असून ते प्राप्त होताच इमारतीचा वापर सुरू करता येईल असे नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**म्हाडाच्या कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने सोडती मधील लॉटरी विजेत्यांची घरे परस्पर विकल्याबाबत**

**(४) ४८९१ (१३-११-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाने सन २०१८ मध्ये काढलेल्या सोडतीमध्ये संकेत क्रमांक २७५ आणि २७२ (इंटरग्रेटेड ॲड टाऊनशिप प्रोजेक्ट) मधील विजेत्यांनी त्यांची पात्रता निश्चित होताच घराची दहा टक्के रक्कम (प्रशासकीय फी) म्हाडा मिळकत व्यवस्थापक यांच्याकडे जमा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंजर्ली खोणी येथील श्री.विजय आडे यांना मिळालेले पलावा सिटीमधील सी-८०७ क्रमांकाच्या घराचे १० टक्के रक्कम भरून सहा महिने उलटले असून पलावा डेव्हलपर्सने उक्त घराचा ताबा परस्पर दुसऱ्या व्यक्तीला विकला असून सद्य:स्थितीत सदर घराचा ताबा घर विकलेल्या व्यक्तीकडे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण, अंजर्ली-खोणी येथील अत्यल्प, अल्प गटातील घरांच्या सोडतीतील विजेत्यांची घरे वर्षभरापूर्वीच म्हाडातील अधिकारी आणि पलावा डेव्हलपर्स यांनी परस्पर विकली असल्यामुळे संतप्त झालेल्या विजेत्यांनी आक्रमक पवित्रा घेऊन आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा दिला

असून सहा महिन्यांपूर्वी दोन विजेत्यांनी सदर विकासकाविरोधात डोंबिवलीतील मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, म्हाडा व विकासकाने संबंधित ६१० विजेत्यांना त्वरित सदनिका वितरित करण्याबाबतचा निर्णय शासनाने दिनांक २७ सप्टेंबर, २०२० रोजी दिला असूनही अद्याप सदनिका वितरित करण्यात आली नसल्यामुळे उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकारी व विकासकावर शासनाने कारवाई करुन सोडतीतील विजेत्यांना तातडीने घरे उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड (०३-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) म्हाडाच्या अहवालानुसार, श्री.विजय आडे यांचे नाव समाविष्ट असलेली यादी म्हाडाकडून विकासकास उशिराने प्राप्त झाल्याने विकासकाने सदर सदनिका दुसऱ्या व्यक्तीस विक्री केलेली आहे. तथापि, श्री.आडे यांना त्याच इमारतीमधील अन्य सदनिकेचा ताबा देण्याची कार्यवाही विकासकस्तरावर सुरु आहे.

(३) अशी बाब म्हाडाच्या निदर्शनास आलेली नाही, असे मुख्य अधिकारी, कोकण मंडळ, म्हाडा यांनी कळविले आहे.

(४) हे खरे नाही.

सदर ६१० विजेत्यापैकी ज्या विजेत्यांनी विहित मुदतीमध्ये विक्री किंमतीचा भरणा विकासकाकडे केला आहे. अशा ५०८ विजेत्यांना सदनिकेचा ताबा देण्यात आलेला आहे. तसेच, यापैकी ३२ लाभार्थ्यांनी आपली सदनिका Surrender केलेली असून उर्वरित ७० विजेत्यांच्या ताब्याबाबतची कार्यवाही विकासकस्तरावर चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील विविध शासकीय कार्यालयाच्या जीर्ण इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत**

**(५) ४९१० (१३-११-२०२०) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याची उपराजधानी नागपूर येथील विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, सिंचन विभाग, महानगरपालिकेची जुनी इमारत, जिल्हा परिषदेची जुनी इमारत इत्यादी शासकीय कार्यालये जीर्ण झाली असून त्यातील विजेची वायरिंग सुध्दा जुनी झाल्यामुळे तुटुन लोंबकळत असल्याने कार्यालयात शॉट सर्कीट होवुन आग लागण्याचा धोका निर्माण झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्व जीर्ण झालेल्या इमारतीचे सार्वजनिक बांधकाम विभाग व विद्‍युत विभागातर्फे ऑडीट झालेले आहे काय व त्याचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०३-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) नागपूर येथील उक्त शासकीय इमारतींचे आवश्यकतेनुसार स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले असून स्ट्रक्चरल ऑडीटनुसार सुचविण्यात आलेल्या विविध दुरुस्त्या करुन सदर इमारतींचा वापर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

___

## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र प्राधिकरण (म्हाडा) कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन लागू करण्याबाबत

**(६) ४९३८ (१३-११-२०२०) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन सेवेतील सर्व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन लागू असून म्हाडा कर्मचारी मात्र त्यास अपवाद ठरत आहेत. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र प्राधिकरण म्हणजेच म्हाडा कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती लढा गत सुमारे ३८ वर्षापासून सुरू असून सेवानिवृत्ती वेतन हा कर्मचाऱ्यांचा हक्क आहे असे मा.सर्वोच्च न्यायालयाने मान्य करूनही शासनाकडून आजमितीस कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडा कायद्यातील कलम १९(५) मधील तरतूदीनुसार कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन लागू आहे व केवळ नियम बनविलेले नसल्यामुळे म्हाडा कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतनाचा लाभ घेता येत नसल्याचे म्हाडाचे सचिव श्री.राजकुमार सागर यांनी गृहनिर्माण विभागाला दिनांक ११ सप्टेंबर, २०२० रोजी लिहिलेल्या पत्रात स्पष्टपणे म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडा कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती वेतनाच्या प्रलंबित असलेल्या प्रश्नाबाबत त्वरीत निर्णय घेऊन सेवानिवृत्ती वेतन लागू करण्यात यावे, अशा आशयाच्या मागणीचे एक निवेदन म्हाडा सेवानिवृत्त कर्मचारी समितीचे निमंत्रक श्री.कृष्णा जाधव यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान पाठविलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने म्हाडा कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन अदा करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड (०३-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

म्हाडा सेवानिवृत्त कर्मचारी सेवा संघ यांनी म्हाडा कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन लागू करण्याबाबत दिनांक १०/०२/२०२० रोजी दाखल केलेली याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळलेली आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) म्हाडा कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन लागू करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक १३ जून, २०१२ रोजी मा.मंत्रिमंडळाने अमान्य केला असून यापुढे म्हाडा कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन देण्याबाबत ठराव म्हाडाने करु नये, असे शासनाच्या दिनांक ३०/०६/२०१२ रोजीच्या पत्रान्वये म्हाडास कळविण्यात आले आहे.

---

## मंडणगड-बाणकोट-वेसवी-वेळास (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) येथील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(७) ४९४४ (१३-११-२०२०) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडणगड-बाणकोट-वेसवी-वेळास (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) व्यापार उद्दीमांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा तसेच कायम वर्दळीच्या रस्त्यांवर जागोजागी मोठमोठे खड्डे पडल्यामुळे सदर रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली असून रस्त्यावरून वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने सदर रस्त्यांचे मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याकरीता परिसरातील ग्रामस्थांनी गत १ वर्षापासून सातत्याने मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, रत्नागिरी जिल्हा, कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, चिपळूण, अधीक्षक अभियंता, रत्नागिरी, सा.बां.मंडळ आदीकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीवर्धन हरिहरेश्वर येथे जाण्यासाठी वेसवी येथील फेरी बोटीवरून जाण्याचा एकमेव मार्ग उपलब्ध असल्यामुळे शाळा, महाविद्लयासह व्यापारी, शासकीय कामकाजासाठी वेळास, बाणकोट, वेसनी, उमरोली, गुडेघर,

पन्हळी, नांदगाव, गोकुळगाव, शिपोळे बंदर आदी गावातील जनतेस मंडणगड येथे येण्याजाण्यासाठी दररोज सदर मार्गाचा वापर करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त रस्त्याचे विनाविलंब मजबुतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (०३-१२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रश्नांकित बाणकोट ते वेळास ही लांबी रेवस रेडी रस्ता प्रामा ४ चा भाग आहे. या लांबीचे मजबुतीकरण व नुतनीकरण मार्च, २०१८ च्या अर्थसंकल्पीय कामातून पूर्ण करण्यात आले असून ही लांबी वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.

तसेच बाणकोट-वेसवी-मंडणगड हा रस्ता प्रामा १५ असा आहे. या लांबीतील सा.क्र.०/०० ते ७/०० ही लांबी खराब आहे. या खराब लांबीपैकी ०/०० ते ३/०० या लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम मंजूर असून अंदाजपत्रक स्तरावर आहे. उर्वरीत ३/०० ते ७/०० या लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम मंजूर असून निविदास्तरावर आहे. उर्वरीत कि.मी. ७/०० ते २३/०० एकूण १६ कि.मी. लांबीमध्ये विविध योजनांतून नुतनीकरण करण्यात आले असून सदर लांबी वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.

(२) हे खरे आहे.

(३) बाणकोट-मंडणगड-महाड-पंढरपूर रस्ता प्रामा १५ चे सा.क्र. ३/०० ते ७/०० या लांबीमध्ये जून, २०१९ च्या अर्थसंकल्पातून मजबुतीकरण व नुतनीकरणाचे कामाची निविदा बोलावण्यात आली आहे.

तसेच सदर रस्त्यावर मार्च, २०२० च्या अर्थसंकल्पात सा.क्र. ०/०० ते ३/०० हे काम मंजूर झाले असून कोविड-२०१९ च्या प्रादुर्भावामुळे योजनांतर्गत व योजनेत्तर कामांना तुर्तास स्थगिती आहे. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कामराज नगर, घाटकोपर (पूर्व) येथील एसआरए योजनेमधील विविध समस्येबाबत

**(८) ४९४५ (१३-११-२०२०) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामराज नगर, घाटकोपर (पूर्व) येथे एसआरए योजना राबविण्यासाठी विकासकाने रहिवाशांची घरे रिकामी करून स्थलांतरीत केलेल्या ७ मजली संक्रमण शिबिराची देखभाल-दुरुस्ती अभावी दुरवस्था झाल्याने रहिवाश्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शिबिरातील लिफ्ट ८ महिन्यापासून बंद असून पिण्याच्या पाण्याच्या टाकीच्या बाजूने सांडपाणी आणि शौचालयाचे सांडपाणी वाहत आहे तसेच विकासकाने रहिवाशांचे गत २ वर्षापासून भाडे थकविले असून गत ७ वर्षापासून एसआरए इमारतींचे बांधकामही बंद असल्याने रहिवाशी आपल्या हक्काच्या घरांच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक नगरसेवक श्री.परमेश्वर कदम तसेच रहिवाशांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र पाठवून व सातत्याने पाठपुरावा करून समस्या सोडविण्यासाठी विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड (०३-१२-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

घाटकोपर (पूर्व), कामराज नगर येथे जुनी रमाबाई व संत नामदेव या संस्थेतील झोपडपट्टीधारकांसाठी तात्पुरते संक्रमण शिबिर बांधण्यात आले आहे. तसेच सदर संक्रमण शिबिरामध्ये आवश्यकतेनुसार दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत. सदर बांधकाम अद्यावत ठेवण्यासाठी विकासकास वेळोवेळी निर्देश देण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

सदर संक्रमण शिबिरामध्ये पाणी, वीज इत्यादी मूलभूत सोयी उपलब्ध करुन दिल्या आहेत. संक्रमण शिबिरातील दुरुस्तीची कामे करण्यासाठी विकासकास निर्देश देण्यात आले आहे.

तसेच संस्थेने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दिनांक ०४/०९/२०२० रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने थकीत घरभाडे प्रकरणी सुनावणी सुरु आहे.

सदर संक्रमण शिबिरामध्ये पाणी, वीज, उदवाहन इत्यादी सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. तसेच, या सुविधा अद्ययावत ठेवण्यासाठी विकासकाने देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी कंत्राटदारासोबत Bi-Party Agreement केले आहे व आवश्यक ती कामे करुन घेतली जात आहेत.

(३) हे खरे आहे.

याबाबत योजनेचे विकासक व वास्तुविशारद यांना विविध समस्यांचे निराकरण करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकाक्षेत्रात भूमाफियांनी मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे केल्याबाबत**

**(९) ५००७ (१३-११-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकाक्षेत्रात लॉकडाऊनचा फायदा घेवून भूमाफियांनी मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे केली असून गत चार महिन्यात महानगरपालिका कार्यक्षेत्रात जवळपास एक ते दीड हजार बेकायदेशिर बांधकामे वाढली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी/चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनस्तरावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-१२-२०२०)** : (१) व (२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात लॉकडाऊन कालावधीत बेकायदेशीर बांधकामे वाढली अशी वस्तुस्थिती नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत अनधिकृत बांधकामांविरूध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ तसेच दिनांक ०२/०३/२००९ मधील शासन निर्णयानुसार निरंतर कारवाई करण्यात येते.

सन २०१५ ते दिनांक १५/११/२०२० पर्यंत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या एकूण १० प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत एकूण १०३९२ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आलेली आहेत, तसेच ४१२ गुन्हे दाखल करण्यात आले असून याबाबतची माहिती महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१०) ५०३८ (१३-११-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.महादेव जानकर : तारांकित प्रश्न क्रमांक ५७० ला दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाचे दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१० पासून सुरु असलेले काम अपूर्णावस्थेत असून सदर महामार्गाच्या करारानुसार केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण व मे.पी.एस.टी.आर.पी.एल. यांच्यामार्फत सुरु असलेले काम दिनांक ३१ मे, २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्णत्वास जाण्यासाठी अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे व उक्त राष्ट्रीय महामार्गाच्या निविदा प्रक्रियेत काम पूर्ण करण्याचा कालावधीबाबतच्या अटी व शर्ती काय होत्या तसेच सदर राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू झाल्यापासून आजवर किती अपघात झालेले आहेत व किती जणांना अपघातात प्राण गमवावा लागला आहे याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०१-१२-२०२०) :** (१) पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाचे सहा पदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारीत येते.

हे खरे आहे. सदर काम दिनांक ३१ मे, २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे फेब्रुवारी, २०२० दरम्यान नियोजन होते. परंतु कोविड-१९ मुळे देशातील लॉकडाऊन परिस्थितीमुळे देखभाल दुरुस्तीच्या कामावर तसेच उर्वरीत मूळ बांधकामांवर परिणाम झाला असून आता शिल्लक काम मार्च, २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(२) सदर रस्त्याच्या एकूण १४०.३५० कि.मी. पैकी १३४.८१ कि.मी. लांबीच्या मुख्य रस्त्याच्या सहापदरीकरणाचे काम सद्य:स्थितीत पूर्ण झाले असून उर्वरीत ५.५४ कि.मी.चे काम (स्ट्रक्चर्स व ॲप्रोचसह) मार्च, २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

ऑक्टोबर, २०१० ते ऑक्टोबर, २०२० दरम्यान ४४१७ अपघात झाले असून अपघातातील मृत्यू ६५६ आहेत. तथापि, प्रोजेक्टच्या स्वतंत्र अभियंताने दिलेल्या वृत्तानुसार सदर अपघात हे प्रामुख्याने दारूच्या नशेत ड्राईव्ह करणे, ओव्हर स्पीडिंग करणे, वाहन नियंत्रणाबाहेर असणे, ड्रायव्हरचे दुर्लक्ष वगैरे बाबींमुळे झाले असल्याचे निदर्शनास येते. परंतु रस्ता अपघातावर नियंत्रण

ठेवण्याच्या दृष्टीने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, स्वतंत्र अभियंता आणि कंत्राटदार यांचे मार्फत आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात येऊन काम करण्यात येत आहे असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश निर्गमित करुनही बढत्यांमधील आरक्षण देण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(११) ५०५१ (१३-११-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके : दिनांक १० डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक ४०९४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.उच्च न्यायालय, मुंबई रिट याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दिनांक ०४ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयानुसार पदोन्नत्यांमध्ये आरक्षण रद्दबातल ठरविले असल्याने मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाविरोधात महाराष्ट्र शासनाने विशेष अनुमती याचिका (SPL) क्र.२८३०६/२००७ मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केले असता बढत्यांमधील आरक्षणाच्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या निकालात बढत्यांमध्ये आरक्षण देण्याची तरतूद केल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर (MAT) यांनी मागासवर्गीय यांची पदोन्नती संपूर्णपणे बंद करणे चुकीचे असून त्यांना सेवा जेष्ठतेप्रमाणे पदोन्नती देण्यात यावी असे आदेश निर्गमित केले आहे तसेच सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी पत्र निर्गमित करुन पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवा ज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत, असे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या सदर निर्णयामध्ये मागासवर्गीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात येवू नये असा कुठेही उल्लेख नाही, तसेच महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर खंडपीठ यांचे मूळ अर्ज क्र.९५३/२०१९ वर दिनांक १३ फेब्रुवारी, २०२० रोजी व महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबईने मूळ अर्ज क्र.८०७/२०१९, ९३९/२०१९, ९९१/२०१९ वर दिनांक ३ मार्च, २०२० रोजी दिलेल्या निर्णयानुसार मूळ संवर्गातील सेवाज्येष्ठता विचारात घेवून खुल्या संवर्गातील सेवा कनिष्ठ अधिकारी पदोन्नत होत असल्यास मागासवर्गीय अधिकाऱ्याला पदोन्नती देण्याचे आदेश दिनांक १८ एप्रिल, २०२० व दिनांक २९ सप्टेंबर, २०२० रोजी निर्गमित करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२० मध्ये विधानपरिषदेत सादर करण्यात आलेल्या लक्षवेधी सुचनेला उत्तर देताना मा.मुख्यमंत्री महोदयांनी मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना सेवा जेष्ठतेप्रमाणे पदोन्नती देण्यात येत आहे असे सांगितले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेल्या निर्णयानुसार मूळ संवर्गातील सेवाज्येष्ठतेचा विचारात घेवून खुल्या संवर्गातील सेवा कनिष्ठ अधिकारी पदोन्नत होत असल्यास मागासवर्गीय अधिकाऱ्यांचा विचार करुन त्यांना पदोन्नती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०२-१२-२०२०) :** (१) मा.सर्वोच्च न्यायालयाने एम.नागराज प्रकरणी दिनांक १९/१०/२००६ रोजी दिलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्याची आवश्यकता नसल्याचा तसेच पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या मागासलेपणाची माहिती संकलित करण्याची आवश्यकता नसल्याचा निर्णय दिनांक २६/०९/२०१८ रोजी विशेष अनुमती याचिका क्र. ३०६२१/२०११ (जर्नेलसिंग व इतर विरुध्द लक्ष्मीनारायण गुप्ता व इतर) यामध्ये दिलेला आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ४/०८/२०१७ रोजीच्या आदेशाविरुध्द राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दिनांक १३/१०/२०१७ रोजी विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ दाखल केली. सदर याचिकेमध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ४/०८/२०१७ च्या आदेशास स्थगिती दिलेली नसल्यामुळे खुल्या प्रवर्गातील पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत, अशा सूचना दिनांक २९/१२/२०१७ च्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आल्या. त्यानुसार खुल्या प्रवर्गात पदोन्नत्या देताना जेष्ठतेनुसार पात्र असणाऱ्या खुल्या प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी तसेच ज्यांना दिनांक २५/०५/२००४ नंतर आरक्षणांतर्गत पदोन्नती मिळालेली नाही, अशा मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना देखील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांवर सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर यांनी दिनांक १३/०२/२०२० रोजी व महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दिनांक १८/०४/२०२० व २९/०९/२०२० रोजी मूळ संवर्गातील सेवाज्येष्ठता विचारात घेऊन खुल्या संवर्गातील सेवा कनिष्ठ अधिकारी पदोन्नत होत असल्यास मागासवर्गीय अधिकाऱ्याला पदोन्नती देण्याचे आदेश दिलेले आहेत.

(४) होय, हे खरे आहे.

(५) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेल्या निर्णयानुसार मूळ संवर्गातील सेवाज्येष्ठतेचा विचारात घेवून खुल्या संवर्गातील सेवा कनिष्ठ अधिकारी पदोन्नत होत असल्यास सेवाज्येष्ठ मागासवर्गीय अधिकाऱ्यांचा विचार करुन त्यांना पदोन्नती देण्यासंदर्भात दिनांक २९/१२/२०१७ च्या पत्रात आवश्यक ते स्पष्टीकरण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी शहर पाणीपुरवठा योजनेत अनियमितता झाल्याबाबत

**(१२) ५११० (१३-११-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महानगरपालिकेने UIDSSMT या योजनेंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी लागणारी जमीन संपादित न करताच पुढील प्रक्रिया केल्याने १३१ कोटी रूपयांचा निधी ५ वर्षापेक्षाही अधिक कालावधीपासून प्रलंबित ठेवल्याप्रकरणी नागपूर येथील महालेखापालाने आक्षेप नोंदविले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यापूर्वीच जागेची उपलब्धता व इतर तांत्रिक बाबी पूर्ण करणे बंधनकारक असतानाही तत्कालीन अधिकारी व इतरांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याने ही योजना विहित मुदतीत कार्यान्वित होऊ शकली नाही, अशी तक्रार परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने तत्कालीन अधिकारी व इतर दोषींची चौकशी करून त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-१२-२०२०) :** (१) महालेखापाल, नागपूर यांनी केंद्र शासनाच्या युआयडीएसएसएमटी अभियानांतर्गत पाणीपुरवठा प्रकल्पातील जलशुध्दीकरण केंद्राची जागा संपादन करण्यास उशीर झाल्याबाबत लेखा आक्षेप नोंदविला होता, हे खरे आहे.

उपस्थित केलेल्या आक्षेपावर परभणी महानगरपालिकेमार्फत दिनांक १२/०५/२०२० रोजीच्या पत्रान्वये महालेखापाल, नागपूर यांच्याकडे सविस्तर माहिती सादर करण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) युआयडीएसएसएमटी अभियानांतर्गत परभणी शहरास पाणीपुरवठा करण्याकरीता रुपये १३१.०६ कोटी किंमतीच्या प्रकल्पास मंजुरी देण्यात आली होती.

सदर प्रकल्पाच्या जलशुध्दीकरण केंद्रास जागा उपलब्ध करण्यास विलंब झाल्यामुळे कामास विलंब झाला होता. त्यासंदर्भात महालेखापाल, नागपूर यांनी लेखा आक्षेप नोंदविले होते, हे खरे आहे.

परभणी शहराची वाढती लोकसंख्या व पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत परभणी शहरास रुपये १०३.३८ कोटी किंमतीचा पाणीपुरवठा प्रकल्प मंजूर करण्यात आला असून युआयडीएसएसएमटी अभियानामधील समाविष्ट असलेले जलशुध्दीकरण केंद्र कमी करून केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेत समाविष्ट करण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत जलशुध्दीकरण केंद्रासह युआयडीएसएसएमटी आणि अमृत योजनेचे काम पूर्ण झाले असून नागरिकांना पाणीपुरवठा करण्यात येत असून नवीन नळ जोडणीचे काम सुध्दा प्रगतीपथावर आहे.

पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यापूर्वीच जागेची उपलब्धता व इतर तांत्रिक बाबी पूर्ण करणे बंधनकारक असतानाही तत्कालीन अधिकारी व इतरांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याने ही योजना विहित मुदतीत कार्यान्वित होऊ शकली नसल्याबाबतची तक्रार तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आली होती. मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशान्वये सदर प्रकल्पाबाबतची चौकशी करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणात जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्यावर दोषारोपपत्र बजावण्यात आलेले असून त्यांची विभागीय चौकशी चालू आहे.

---

## परभणी येथे बाहयवळण रस्त्याकरिता भूसंपादन करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना मावेजा मिळण्याबाबत

**(१३) ५१३६ (१३-११-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी : तारांकित प्रश्न क्रमांक ४६९६७ ला दिनांक १८ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहराबाहेरून जाणाऱ्या बाहयवळण रस्त्याच्या कामाकरीता शेतकऱ्यांचे जमीन हस्तांतरणाबाबत १६० शेतकऱ्यांचे कागदपत्रे व खाते क्रमांक मुंबई येथील राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण कार्यालयाकडे सन २०२० मध्ये सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांना मावेजा वाटप करण्यात आला आहे काय तसेच परभणी बाहयवळण रस्त्याचे कामाकरीता भूसंपादन करण्यासाठी केंद्र शासनाच्या सन २०१९-२०२० च्या वार्षिक नियोजनामध्ये प्रस्तावित केलेल्या निधीस मंजुरी मिळाली आहे काय, निधीच्या अनुषंगाने भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची थोडक्यात सविस्तर माहिती व सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (०१-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

जमीन हस्तांतरणाबाबत एकूण २५८ पैकी १८० शेतकऱ्यांचे कागदपत्रे व खाते क्रमांक मुंबई येथील राष्ट्रीय महामार्ग (भुपृष्ठ व सडक परिवहन मंत्रालय) कार्यालयाकडे जमा करण्यात आले असून ७८ शेतकऱ्यांचे कागदपत्रे व खाते क्रमांक अप्राप्त आहेत.

(२) परभणी बाहयवळण रस्त्याचे कामाकरीता एकूण ८४.४५ हेक्टर एवढया जमिनीची आवश्यकता आहे व केंद्र शासनाच्या सन २०१९-२०२० च्या वार्षिक नियोजनामध्ये प्रस्तावित असलेल्या भूसंपादनाकरीता केंद्र शासनाने

दिनांक १३/०२/२०२० रोजी रुपये ६८.०१ कोटी मंजूर केले आहेत. भूसंपादनासाठी शेतकऱ्यांचे खाते क्रमांक पडताळणीची प्रक्रिया सुरु असून Online Bhoomirashi पोर्टलव्दारे शेतकऱ्यांना मावेजा रक्कम थेट खात्यात जमा करण्याची प्रक्रिया कार्यान्वित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कोरोनाच्या साथीमध्ये खाजगी रुग्णालये वाढीव दराने बिलांची आकारणी करीत असल्याबाबत

**(१४) ५१५४ (१३-११-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाची साथ सुरू झाल्यानंतर शहरातील खाजगी रुग्णालयाकडून मनमानी पध्दतीने बिलांची आकारणी केली जात असल्याच्या अनेक तक्रारी महानगरपालिकेकडे करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महानगरपालिकेने खाजगी रुग्णालयावर कोणत्या स्वरुपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतचा तपशील काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-१२-२०२०)** : (१) अंशत: खरे आहे.

(२) शासनाने कोविड रुग्णांचे उपचाराकरीता दिनांक २१ मे, २०२० व दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० चे अधिसूचनेतील ॲनेक्शचर “सी” नुसार कमाल दर मर्यादा निश्चित केलेली आहे.

त्यानुषंगाने महापालिकेने खाजगी रुग्णालयातून डिस्चार्ज होणारे रुग्णांचे बिलाचे लेखापरिक्षण तसेच रुग्णांचे तक्रारीचा निपटारा करणेकरीता ऑडीटरची नेमणूक केली आहे.

लेखापरिक्षण व प्राप्त तक्रारीनुसार उपरोक्त अधिसूचनेतील नमूद दरापेक्षा जादा आकारणी झालेल्या रुग्णांना जादाची रक्कम परत करण्यात आली आहे.

तक्रारींची दखल न घेता व रुग्णांस रक्कम परत न करणाऱ्या रुग्णालयाचा महापालिकेने दिलेला कोविड दर्जा काढून घेवून रुग्णालय तात्पुरते बंद करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाशिम जिल्हा सत्र न्यायालयातील प्रतिक्षा सूचीवर असलेल्या शिपाई पदाच्या उमेदवारांना सेवेत सामावून घेण्याबाबत

**(१५) ५१५९ (१३-११-२०२०) अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हा सत्र न्यायालयातील प्रतिक्षा सूचीवर प्रलंबित असलेल्या उमेदवारांना शिपाई पदावर सामावून घेण्यात येईल असे आश्वासन अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२० मध्ये मा.विधी व न्याय राज्यमंत्री यांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशीम जिल्हा सत्र न्यायालयातील शिपाई पदांची प्रतिक्षा यादीची मुदत माहे डिसेंबर, २०२० मध्ये समाप्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मुदत संपण्यापूर्वी प्रतिक्षा यादीतील शिपाई पदाच्या उमेदवारांना सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०१-१२-२०२०) :** (१) होय.
(२) होय.
(३) सन २०१८ मधील भरती प्रक्रियेत वाशीम जिल्हा न्यायालयातील भरती समितीने तयार केलेल्या ५० शिपाई पदांसाठीच्या उमेदवारांच्या निवड/प्रतिक्षा यादीस मा.उच्च न्यायालयाने मान्यता दिली आहे. सदर निवड/प्रतिक्षा यादीची वैधता दोन वर्षासाठी म्हणजेच दिनांक ४/१२/२०२० पर्यंत आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी सन २०१८ मधील वाशीम जिल्ह्यातील शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत अस्तित्वात असलेल्या निवड/प्रतिक्षा यादीस एक वर्षासाठी मुदतवाढ मंजूर केली आहे. दिनांक २४/११/२०२० पावेतो २६ उमेदवारांना नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई व ठाणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रलंबित असल्याबाबत

**(१६) ५१६० (१३-११-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथे झोपडपट्टी पुनर्वसनाच्या एकूण १४८१ व ठाणे येथे एकूण ७१ योजना राबविल्या जात असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने घेतलेल्या आढाव्यामार्फत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, न्यायालयीन प्रकरणे व विविध शासकीय विभागामार्फत अप्राप्त ना-हरकत प्रमाणपत्र, वित्त पुरवठ्याचा अभाव इत्यादी कारणास्तव एकूण ७८१ योजनांचा विकास प्रलंबित तसेच संथगतीने सुरु असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रलंबित योजना विहित कालमर्यादेत पूर्ण करण्याबाबत तसेच झोपडीधारकांना ४०० चौ.फुटांच्या सदनिका बांधून देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जितेंद्र आव्हाड (०२-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) संथगतीने सुरु असलेल्या ७८१ झोपडपट्टी पुनर्वसन योजनांपैकी तांत्रिक बाबींमुळे रखडलेल्या योजनांची संख्या तुलनेने कमी आहे. त्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचा वेग केवळ तांत्रिक अडचणींमुळे मंदावला, असे म्हणणे संयुक्तीक होणार नाही. मात्र वित्त पुरवठ्या अभावी व सक्षम प्राधिकाऱ्यांकडे परिशिष्ट-२ प्रलंबित असल्यामुळे त्याचप्रमाणे संबंधित योजनेतील झोपडीधारकांचे सहकार्य मिळत नसलेल्या योजनांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.

विहित कालावधीत जलदगतीने परिशिष्ट-२ देण्यासाठी विभागवार समर्पित उप जिल्हाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची बाब विचाराधीन आहे.

योजनेच्या बांधकामास सहकार्य न करणाऱ्या झोपडीधारकांची संख्या लक्षात घेता प्रचलित असलेली अपिलीय तरतूद बदलून त्याऐवजी समर्पित एकच अपिलीय समिती नेमण्याची बाब देखील विचाराधीन आहे.

वित्तपुरवठ्या अभावी संथगतीने सुरु असलेल्या योजनांची संख्या पाहता, वित्त पुरवठा करणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकांसोबत भागधारक/गुंतवणूकदार यांच्या आवश्यक बैठकांचे आयोजन शासनस्तरावर करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद-माहूर (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) या राष्ट्रीय महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१७) ५२४५ (१३-११-२०२०) डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद-माहूर (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) या राष्ट्रीय महामार्गाचे चालू असलेल्या कामांमध्ये धाणकी-फुलसावंगी या रस्त्यावर माती मिश्रित मुरुमाचा वापर होत असल्यामुळे उक्त रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून त्यावर खड्डे पडल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर रस्त्याचे काम उत्कृष्ट दर्जाचे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोक चव्हाण (०१-१२-२०२०)** : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## फुलंब्री ते खुलताबाद (जि.औरंगाबाद) रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१८) ५२६७ (१३-११-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुलंब्री ते खुलताबाद (जि.औरंगाबाद) रस्त्याचे गत वर्षभरापासून सुरु असलेले सिमेंट, कॉंक्रीटीकरण तसेच मजबुतीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे उक्त रस्ता खचून व भेगा पडून रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोक चव्हाण (०१-१२-२०२०)** : (१) अंशत: खरे आहे.

फुलंब्री ते खुलताबाद (जि.औरंगाबाद) सिमेंट, कॉंक्रीटीकरण तसेच मजबुतीकरणाच्या कामात काही ठिकाणी अंशत: प्रमाणात भेगा पडल्याचे निदर्शनास आलेले आहे. सदर भागात संबंधित कंत्राटदारामार्फत दुरुस्तीचे काम प्रगतीत आहे.

(२) करारनाम्यानुसार Civil Tech या त्रयस्थ यंत्रणेकडून तपासणी करण्यात आली असून प्राप्त तपासणी अहवालानुसार काही पॅनलमध्ये दुरुस्ती आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार सदर ठिकाणची दुरुस्ती कंत्राटदारामार्फत करुन घेण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिकेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांना सातवा वेतन लागू करण्याबाबत

**(१९) ५३०८ (१३-११-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांना सातवा वेतन लागू करण्याचा निर्णय महानगरपालिका सभागृहात वर्षभरापूर्वी घेऊनही शासनाची परवानगी न मिळाल्याने सदर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन लागू केला नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक व कर्मचाऱ्यांना ५० लाखांचे विमा कवच तसेच ऑनलाईन शिक्षणाची दुय्यम जबाबदारी असलेल्या शिक्षकांना कोणतेही एक कार्य देण्याचा निर्णय ही घेण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या नगर विकास विभागांतर्गत येणाऱ्या मागण्या मंजूर करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-१२-२०२०) :** (१) नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारसी लागू करण्याच्या संदर्भात, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांचेकडून प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) "कोविड-१९ शी संबंधित कर्तव्य बजावताना कोविडमुळे मृत्यू होणाऱ्या कर्मचाऱ्यांना विमा कवच/सानुग्रह सहाय्य लागू करण्याबाबत" च्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तद्नुसार, कोविड-१९ शी संबंधित कर्तव्य बजावत असताना, मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांचे विमा रकमेबाबतचे प्रस्ताव महानगरपालिकेकडून संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांना पाठविले जातात व त्यांच्याकडून याबाबतची पुढील कार्यवाही होते.

महापालिकेच्या आस्थापनेवरील शिक्षक कर्मचाऱ्यांना कोरोना कालावधीत आवश्यकतेनुसार, कोरोनाशी निगडीत कार्य सोपविण्यात आले होते.

तथापि, कोरोना लॉकडाऊन शिथील झाल्यानंतर, राज्यातील शाळा/ शिक्षण टप्प्याटप्प्याने सुरु करणेसंदर्भात शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १५ जून, २०२० च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार महापालिकेच्या शिक्षकांना टप्प्याटप्प्याने, ऑनलाईन शिक्षणाची जबाबदारी देण्यात आलेली आहे.

(३) व (४) नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारसी लागू करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## पुणे जिल्हयात आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याबाबत

**(२०) ५३८२ (१३-११-२०२०) श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ३१८ ला दिनांक ११ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याकरिता महाराष्ट्र शासन व भारतीय विमान प्राधिकरण यांचेमार्फत दिनांक ११ सप्टेंबर, २०१६ रोजी पाहणी करुन पुरंदर येथील जागा निश्चित करुन त्याबाबतचा अहवाल शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विमानतळ उभारण्याकरीता जवळजवळ सर्व परवानग्या मिळालेल्या असतानाही पुढील कार्यवाही करण्यास विलंब होत असल्यामुळे त्यासंदर्भात दिनांक ६ डिसेंबर, २०१८ रोजी अथवा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये काही निर्णय घेण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त बैठकीतील निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच उक्त आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी किती निधीची आवश्यकता आहे, सदर निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे व बांधकाम केव्हा सुरु करुन ते किती कालावधीत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२६-११-२०२०)** : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नविन विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे काम शासनाच्या कंपन्या अथवा अंगीकृत उपक्रमांच्या संयुक्त कंपनीमार्फत करण्याचा निर्णय महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या संचालक मंडळाच्या दिनांक ६ डिसेंबर, २०१८ रोजी संपन्न झालेल्या ६५ व्या बैठकीमध्ये घेण्यात आलेला आहे. त्यानुसार दिनांक २ सप्टेंबर, २०१९ रोजी Pune (Purandar) International Airport Ltd. (PIAL) या संयुक्त कंपनीची स्थापना झाली आहे.
(४) सदर विमानतळाच्या भूसंपादनाकरीता सुमारे रुपये ४००० कोटी खर्च अपेक्षित आहे. त्याकरीता दिनांक २ सप्टेंबर, २०१९ रोजी Pune (Purandar) International Airport Ltd. (PIAL) या संयुक्त कंपनीची स्थापना झाली आहे. विमानतळ उभारणीचा एकूण खर्च अद्यापि निश्चित व्हावयाचा आहे. तथापि, शासन निर्णय दिनांक २७/०२/२००९ अन्वये सार्वजनिक-खाजगी-सहभागामार्फत सदर प्रकल्प उभारण्याचे निश्चित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या कामाबाबत

**(२१) ५३८४ (१३-११-२०२०) श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदु मिल, मुंबई येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्मारक उभारण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतल्यानंतर माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान स्मारकाचे भूमिपूजन करण्यात आले असून दिनांक ९ फेब्रुवारी, २०१८ रोजी सदर स्मारकाचे बांधकाम करण्यास मे.शापुरजी पालनजी या कंपनीस कार्यारंभ आदेश देवूनही अद्‌याप अंदाजे २५ टक्केच बांधकाम झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्मारकाच्या कामाच्या स्वरुपात वेळोवेळी बदल करण्यात आल्यामुळे उक्त कामांच्या खर्चाकरीता १०८९ कोटी इतक्यात वाढीव अंदाजपत्रकीय रक्कमेच्या सुधारीत खर्चास व संकल्पचित्रास दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनाने मंजुरी देवूनही त्याबाबतचा शासन निर्णय एमएमआरडीएच्या बैठकीपर्यंत म्हणजे दिनांक ७ जुलै, २०२० पर्यंत निर्गमित केला नसल्याचे दिनांक ३० ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त स्मारकासाठी पुरेसा निधी उपलब्ध होवूनही बांधकाम पूर्ण करण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर स्मारक तात्काळ बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्‌य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-१२-२०२०) :** (१) मेसर्स शापुरजी पालनजी कं.प्रा.लि. यांना दिनांक ९ फेब्रुवारी २०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले असून आजतागायत स्मारकाचे पादपीठ व पुतळा वगळून अंदाजे ३८ टक्के इतके बांधकाम पूर्ण झाले आहे.
(२) होय, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदु मिल येथील आंतरराष्ट्रीय दर्जाचे भव्य स्मारकाच्या सुधारित संरचनेनुसार पुतळ्याची उंची वाढवून पादपीठ ३० मीटर (१०० फूट) उंच व पुतळा १०६.६८ मीटर (३५० फूट) उंच अशी एकूण १३६.६८ मीटर (४५० फूट) उंची ठेवण्यास मा.मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने नगर विकास विभागामार्फत दिनांक १०/०९/२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(३) व (४) सदर स्मारकांतर्गत पुतळा व पादपीठाच्या कामाचे डिझाईन, विंड टनेल चाचणी व सुधारीत संरचनेची आयआयटीमार्फत मान्यता तसेच इतर विविध विभागांच्या नव्याने लागणाऱ्या परवानग्या प्राप्त करण्यासाठी काही कालावधी लागला. सद्य:स्थितीत वरील सर्व बाबींची व परवानगींची पूर्तता झाली असून काम प्रगतीपथावर आहे. तसेच कोविड-१९ या जागतिक महामारीच्या संकटामुळे देखील कामाच्या प्रगतीवर परिणाम झाला. सदर प्रकल्पाचे काम माहे एप्रिल, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर नियोजित आहे.

---

**ऐरोली, नवी मुंबई येथे महानगरपालिकेने सर्व नियम धाब्यावर बसून वृक्षतोड केल्याबाबत**

**(२२) ५४३४ (१३-११-२०२०) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुंदर नवी मुंबई, स्वच्छ मुंबई शहराचे स्वप्न साकार करण्यासाठी नवी मुंबई महापालिकेमार्फत लाखो रुपये खर्च करून वृक्षांची लागवड करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिकेने सर्व नियम धाब्यावर बसवून ऐरोली येथे रात्रीच्या वेळेत मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वृक्षतोड करताना नियमानुसार महापालिकेच्या वृक्षतोड प्राधिकरणाकडून रितसर परवानगी घेण्यात आली होती काय, याबाबत शासनाने चौकशी करुन वृक्षाची बेकायदेशीर कत्तल करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नवी मुंबई महानगरपालिकेच्या ऐरोली विभागामध्ये दिनांक १५/०८/२०२० रोजी रात्रीच्या वेळेस अज्ञात इसमाकडून विनापरवानगी १३ नग झाडे छाटणी केल्याचे निदर्शनास आले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीची परवानगी न घेता बेकायदेशीर वृक्षतोड करणाऱ्या इसमाविरूध्द दिनांक १५/०८/२०२० रोजी रबाळे पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे तक्रार दाखल करण्यात आली.

सदर वृक्ष तोडीबाबत महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ व महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन नियम, २००९ अन्वये न्यायालयीन कार्यवाही सुरू असल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त कोळी समाज व शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करताना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करणेबाबत

**(२३) ५४३५ (१३-११-२०२०) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ४५२ ला दिनांक ४ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील कोळी समाज आणि शेतकऱ्यांच्या जमिनी नवी मुंबईच्या विकासासाठी शासनाने सन १९७० मध्ये संपादित करताना स्थानिक भूमिपुत्रांना आगरी कोळी समाजाची वसाहत असलेली गावठाणे, समाज मंदिर, खेळाची मैदाने, मार्केट, गार्डन्स व शाळा अशा प्रकारच्या अनेक सोयी सुविधा देण्याच्या दिलेल्या आश्वासनाची पुर्तता शासनामार्फत करण्यात आली नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर सोयी सुविधा उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

नवी मुंबईतील विविध नोड्समधील सोयी-सुविधांचे भूखंड सिडको संचालक मंडळाच्या मंजुरीनंतर वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन, विहित अटी व शर्तीनुसार पात्र संस्थांना वाटप करण्याचे सिडकोचे धोरण आहे.

नवी मुंबई मधील विविध नोड मध्ये १२.५% क्षेत्र योजनेच्या रेखांकनामध्ये समाज मंदिर, खेळाचे मैदाने, मार्केट, गार्डन्स, शाळा अशा प्रकारच्या सोयी-सुविधांसाठी एकूण ४११ भूखंड रेखांकीत करण्यात आले आहेत. त्यानुसार विविध नोडमध्ये शालेय संस्थांना १६४ भूखंड, समाज मंदिरांकरीता एकूण १४ इमारती व १३ भूखंड रेखांकित करण्यात आले आहेत. याशिवाय, नवी मुंबईतील प्रकल्पबाधित नागरिकांनी स्थापन केलेल्या ३ संस्थांना सी.बी.डी. बेलापूर सेक्टर २०, नेरुळ सेक्टर २६ व ऐरोली सेक्टर ८ येथे समाज मंदिराकरीता भूखंड तर शाळा, कॉलेज, मंदिर, व्यायामशाळा, महिलामंडळ इ. प्रयोजनासाठी एकूण ३१ भूखंड वाटप करण्यात आले आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मु.पो.सातपाटी (जि.पालघर) धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची नव्याने पुनर्बांधणी करणेबाबत

**(२४) ५४४८ (१३-११-२०२०) श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ३५२८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.सातपाटी (जि.पालघर) या गावातील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची मोठ्या प्रमाणात पडझड झाल्याबाबत तेथील मच्छिमार बांधवांनी गत ६ ते ७ वर्षापासून शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभाग व जिल्हाधिकारी यांना अनेक वेळा तक्रारी आणि लेखी निवेदने दिल्यानंतर एकूण १२२० मीटर लांबीच्या धूपप्रतिबंधक बंधाऱ्याचे करण्यात आलेल्या कामांपैकी ६०० मीटर बंधाऱ्याचे काम पूर्ण झाले असून ३९५ मीटर बंधाऱ्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे माहे मार्च, २०२० च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित २२५ मीटर बंधाऱ्याचे सन २०२०-२०२१ चे अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आलेल्या कामाची सद्य:स्थिती काय आहे, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सातपाटी धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची नव्याने पुनर्बांधणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०१-१२-२०२०) :** (१) होय, सातपाटी येथे धूपप्रतिबंधक बंधारा बांधणेच्या मंजूर असलेल्या १२२० मीटर लांबीपैकी ६०० मी. लांबीच्या धूपप्रतिबंधक बंधाऱ्याचे काम पूर्ण झाले असून उर्वरित ३९५ मी. चे काम प्रगतीपथावर आहे.

(२) सन २०२०-२०२१ चे अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आलेल्या सातपाटी येथील उर्वरित २२५ मीटर लांबीच्या बंधाऱ्याचे कामास तांत्रिक मंजूरी देणे, निविदा प्रक्रिया राबविणेकरीता दिनांक ९/११/२०२० अन्वये शासन मान्यता देण्यात आली असून सदर काम अंदाजपत्रकीय स्तरावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दापोली (जि.रत्नागिरी) येथील आझाद मैदानाचे सुशोभिकरण करुन संरक्षक भिंत बांधणेबाबत**

**(२५) ५४६२ (१३-११-२०२०) श्री.रामदास कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ३८२४९ ला दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) येथील आझाद मैदान सुशोभिकरण व संरक्षक भिंत बांधकामाबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मैदानामध्ये जॉगिंग ट्रॅक व खेळपट्टीसह अनेक सोयी सुविधांचा अभाव असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आझाद मैदानाची जागा महसूल विभागाच्या ताब्यात असून उक्त जागा ताब्यात घेण्याची नगरपरिषदेमार्फत सुरु असलेली कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, सदर मैदानाची जागा विकसित करण्याबाबत नगरपरिषदेच्या नियोजनानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, त्याकरीता किती निधीची आवश्यकता असून ती कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही. अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव दापोली नगरपंचायतीकडून प्राप्त झालेला नाही.

(२) दापोली येथील आझाद मैदान सद्य:स्थितीत नगरपंचायतीच्या ताब्यात नाही. तथापि, दापोली नगरपंचायतीमार्फत मैदानाची नियमितपणे साफसफाई केली जाते.

तसेच, सदर मैदानाजवळ असलेले शौचालयाचे आरक्षण विकसित करुन सदर ठिकाणी दापोली नगरपंचायतीमार्फत सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम केले आहे.

मैदानाच्या ठिकाणी नागरिकांना बसण्यासाठी नगरपंचायतीमार्फत बाके बसविण्यात आलेली आहेत.

मैदानामध्ये जॉगिंग ट्रॅक व खेळपट्टी नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(३) आझाद मैदानावरील आरक्षणाच्या जागा तूर्त महसूल विभागाच्या मालकीच्या असून सदर जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही नगरपंचायत स्तरावर सुरु असल्याचे दापोली नगरपंचायतीने कळविले आहे.

(४) विकास आराखड्यामध्ये आझाद मैदानावर विविध आरक्षणे प्रस्तावित असून सदर आरक्षणानुसार मैदानावर सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सदर मैदान नगरपंचायतीच्या ताब्यात आल्यानंतर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन निधीची मागणी करण्याचे नियोजन असल्याचे दापोली नगरपंचायतीने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पोंगावफाटा ते वडपे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२६) ५४६४ (१३-११-२०२०) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोंगावफाटा ते वडपे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी रस्त्यांवर पडलेल्या खड्डयांमुळे वारंवार अपघात होत असून सदर खड्डे तात्काळ भरुन रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (०१-१२-२०२०) :** (१) होय.

पोंगावफाटा ते वडपे रस्त्याच्या काही भागात चालू वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे खड्डे पडलेले होते. सदर पडलेले खड्डे पावसाळया दरम्यान खडी व मुरूमाने भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुरळीत ठेवण्यात आला होता.

(२) पोंगावफाटा ते वडपे रस्त्यावर पडलेल्या खड्डयांची दुरुस्ती करण्याचे काम सुरु करण्यात आले असून सद्य:स्थितीत रस्त्यावरील खड्डे एमपीएम भरण्यात आले असून रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद शहरातील शिवाजीनगर येथील भुयारी मार्गाच्या कामास मान्यता मिळण्याबाबत

**(२७) ५४७८ (१३-११-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील शिवाजीनगर येथील भुयारी मार्गाच्या कामाकरीता दक्षिण-मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने रेल्वे प्रशासनाबरोबर निधी सामायिकरण (कॉस्ट शेअरींग) करण्याचा प्रस्ताव सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे मंजुरीकरीता पाठविला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भुयारी मार्ग तयार झाल्यास रेल्वे फाटकामुळे सद्य:स्थितीत मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटणार असल्याने शासनाने उक्त प्रस्तावास त्वरीत मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोक चव्हाण (०१-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) विषयांकित भुयारी मार्गाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

## नांदेड शहरातील गोदावरी नदीपात्रातील मलशुध्दीकरण प्रकल्पाचे काम दिर्घकाळापासून प्रलंबित असल्याबाबत

**(२८) ५५९८ (१३-११-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील गोदावरी नदी शुध्दीकरण प्रकल्पासाठी केंद्र शासनाने सन १९९९ मध्ये दिलेल्या १६ कोटी रुपयांच्या निधीतून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे माध्यमातून जलशुध्दीकरण प्रकल्पाचे कामास सुरुवात करुन सन २००८ मध्ये मौ.बोंढार येथे ११० एकर जागेवर मलशुध्दीकरण प्रकल्प उभारण्यात आला होता. परंतु, सन २००८ ते २०१० रोजीपासून सदर प्रकल्पाचे काम बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड-वाघाळा महापालिकेने १३ कोटींची उक्त प्रकल्प योजना सन २०१७ मध्ये कार्यान्वित करुन त्यापैकी ५५ लाख रुपये खर्च करुन नदीपात्रातील १८ नाल्याचे पाणी थेट बोंढार जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत पोहोचविले असल्याचे दिनांक १४ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चुनाल नाला मलशुध्दीकरण केंद्र उभारणीसाठी सन २०१९ मध्ये महापालिकेने पाठविलेल्या रुपये ७७ कोटींच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी देऊन त्यापैकी १७ कोटी रुपयांचे अनुदान महापालिकेस त्याच वर्षी देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्र शासनाने निधी देऊनही सदर प्रकल्पाचे काम जवळपास १८ वर्षे प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त प्रकल्पाला कार्यारंभ आदेश देऊन प्रकल्पाचे काम त्वरित सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-१२-२०२०) :** (१) जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत सन २००७ मध्ये नांदेड शहरातील बोंढार मलशुध्दीकरण केंद्र उभारण्यासाठी केंद्र शासनाकडून रुपये ३६.८५ कोटीच्या प्रस्तावास मान्यता प्राप्त झाली. त्यानुसार मनपाने ८९.३३ एकर एवढ्या जागेवर बोंढार येथे ८७ दलघमी क्षमतेचे मलशुध्दीकरण केंद्र उभारले आहे.

सदरील मलशुध्दीकरण केंद्राचे काम सन २०१४ मध्ये पूर्ण करण्यात आले असून सदर मलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वित आहे.

(२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने नदी काठी वाहिनी व बंधारे बांधण्याचे काम पूर्ण करून २००९ मध्ये महानगरपालिकेकडे हस्तांतरित केले आहे. सदर वाहिनी व बंधाऱ्याच्या कामास बराच कालावधी झाला असल्याकारणाने सदर वाहिनीमध्ये गाळ/कचरा साठल्याने (चोकअप झाल्याने) १७ नाल्यावरील बांधलेले बंधारे नादुरुस्त झाल्याने सदर वाहिनीतील गाळ काढणे, आवश्यकतेनुसार चेंबर्सची उंची वाढविणे, नादुरुस्त वाहिनी बदलणे, बंधारे दुरुस्त करणे, गेट बसविण्याचे कामे हाती घेऊन मनपा निधीतून रुपये ५६.६५ लाख खर्च करण्यात आला आहे, हे खरे आहे.

(३) चुनाल नाला मलशुध्दीकरण केंद्र उभारण्याबाबतच्या महानगरपालिकेच्या प्रस्तावास अनुसरुन पर्यावरण विभागाचे राज्य नदीसंवर्धन योजनेंतर्गत रुपये १७.५९८१ कोटींच्या प्रकल्पास दिनांक ११/०९/२०१९ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

मात्र, त्यासाठीचा निधी पर्यावरण विभागाकडून महानगरपालिकेकडे अद्याप प्राप्त झालेला नाही.

(४) व (५) केंद्र शासनामार्फत सन २००७ मध्ये जेएनएनयुआरएम अभियानांतर्गत मलशुध्दीकरण केंद्र (STP), सांडपणी पंपींग केंद्र (SPS), मुख्य मलनिस्सारण वाहिनी बांधण्यासाठी निधी देण्यात आला होता.

याबाबतचे कार्यादेश सन २००९ मध्ये देऊन सदरील काम २०१४ मध्ये पूर्ण झाले असून आजमितीससुध्दा बोंढार येथील मलशुध्दीकरण केंद्र (STP), सांडपाणी पंपींग केंद्र (SPS), मुख्य मलनिस्सारण वाहिनी कार्यान्वित असून सद्य:स्थितीस त्यांची देखभाल दुरुस्ती देखील करण्यात येत आहे.

---

## केंद्र शासनाने आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र मुंबई ऐवजी अहमदाबाद येथे स्थलांतरित करण्याच्या निर्णय घेतल्याबाबत

**(२९) ५६०५ (१३-११-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बांद्रा-कुर्ला कॉम्पेक्स (बीकेसी) येथे केंद्र शासनामार्फत आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र (आयएफएससी) उभारण्याचा निर्णय केंद्र शासनाने सन २००७ मध्ये घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने सदर आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र मुंबई ऐवजी अचानकपणे गुजरात राज्यातील अहमदाबाद येथे उभारण्यात येणार असल्याचे माहे मे, २०२० मध्ये जाहीर केले असूनही मुंबईतील प्रस्तावित वित्तीय केंद्र रद्द केल्याचे केंद्र शासनाने अधिकृतरित्या जाहीर केले नसल्याचे दिनांक २ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून तेथे बॉम्बे स्टॉक एक्सचेंज, नॅशनल स्टॉक एक्सचेंज, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया तसेच देशातील व परदेशातील बँकांची मुख्यालये, वित्तीय संस्थांची मुख्यालये व जागतिक व्यापार केंद्र इ. महत्वाच्या संस्थांची मुख्यालये मुंबईमध्ये असल्यामुळे केंद्र शासनाने घेतलेल्या पुर्वीच्या निर्णयानुसार प्रस्तावित आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र मुंबईमध्येच उभारण्यात यावे, अशी विनंती राज्यातील लोकप्रतिनिधी व कामगार संघटना तसेच मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणासह राज्य शासनाने देखील केंद्र शासनाकडे दिनांक ३ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दरम्यानच्या काळात बीकेसी, मुंबई येथील प्रोसेसिंग झोन व नॉन प्रोसेसिंग झोनमधील विकासक्षम जमीन व मनोरंजन उपक्रमासाठी राखीव जमिनीच्या एकूण क्षेत्रावर जागतिक वित्तीय सेवा केंद्र व रिक्रिएशनल ग्राऊंड (आरजी) हे दोन्ही प्रकल्प कार्यान्वित होऊ शकतील, याबाबत मुंमप्रवि प्राधिकारणाने सुचित केलेल्या प्रस्तावा संदर्भात शासनाने माहे सप्टेंबर, २०२० अखेरपर्यंत निर्णय घेतला नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र (आयएफएससी) मुंबईमध्ये उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-१२-२०२०)** : (१) केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाव्दारे, मुंबईला जागतिक वित्तीय सेवा केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी एका शक्ती प्रदत्त तज्ञ समितीची स्थापना करण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल सन २००७ मध्ये केंद्र शासनाकडे सादर केला होता.
(२) होय, हे खरे आहे. केंद्र शासनाने, जागतिक वित्तीय सेवा केंद्र प्राधिकरण अधिनियम २०१९ मधील तरतुदीनुसार जागतिक वित्तीय सेवा केंद्र प्राधिकरण स्थापन करणे व देशातील जागतिक वित्तीय सेवा केंद्रामधील वित्तीय सेवा नियमित करणाऱ्या एकात्मिक प्राधिकरणाचे मुख्यालय गांधीनगर, गुजरात येथे स्थापन करण्याबाबत दिनांक २७ एप्रिल, २०२० रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. बीकेसी, मुंबई येथे जागतिक वित्तीय केंद्र मंजूर करण्याबाबत प्रस्ताव केंद्र शासनास यापूर्वी सादर करण्यात आला असून तो रद्द केल्याची बाब निदर्शनास येत नाही.
(३), (४), (५) व (६) राज्य शासनाने, महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी व वांद्रे-कुर्ला संकुलातील वित्तीय संस्थांना पोषक ठरणारे, वित्तीय सेवा उपक्रमांना चालना देणारे जागतिक वित्तीय सेवा केंद्र वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये उभारण्याचे माहे मे, २०१५ मध्ये ठरवले. प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये (बीकेसी) जागतिक वित्तीय सेवा केंद्र स्थापित करण्यासाठी संबंधित भागधारक कोण असावे, तसेच हे केंद्र उभारण्यासाठी कोणत्या कायदेशीर बाबीं विचारात घ्याव्या लागतील याबाबतचा अभ्यास करून पडताळणी अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली होती. विशेष आर्थिक क्षेत्र कायदा, २००५ अंतर्गत बीकेसीतील जी-टेक्स्ट ब्लॉक मध्ये ५०.३१ हेक्टर जमिनीवर विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) मान्य करुन त्यावर जागतिक वित्तीय सेवा केंद्र स्थापन करण्यास मान्यता देण्याबाबत एमएमआरडीएमार्फत माहे जानेवारी, २०१७ मध्ये केंद्र व राज्य शासनास

प्रस्ताव सादर करण्यात आला होता. राज्य शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागामार्फत प्राधिकरणाच्या बीकेसीतील जी-टेक्स्ट ब्लॉक मध्ये सेझ प्रस्तावाच्या मंजूरीसाठी संचालक, वाणिज्य विभाग (विशेष आर्थिक क्षेत्र विभाग, वाणिज्य व उद्योग मंत्रालय), भारत सरकार यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या पत्राव्दारे शिफारस करण्यात आली. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ०७/०७/२०२० रोजीच्या १४९ व्या बैठकीमधील ठराव क्र. १५३४ अन्वये वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉकमधील आरजी-६, आरजी-१९, आरजी-२३ व टेकडीचे (हिल्स) अंदाजे एकूण ६.८७ हे. भुखंडापैकी सीआरझेडमधील अंदाजे ३.१० हे. भूखंडावर सार्वजनिक वापराचा बगीचा व सीआरझेड बाहेरील अंदाजे ३.७७ हे. भूखंडापैकी ०.६८७ हे. भूखंडावर मनोरंजन केंद्र (१.०३१ हे. बांधकाम क्षेत्र) व उर्वरित भूखंडावर "ओपन टू स्काय" वापरांच्या विकासासाठी ई-निविदा पध्दतीने निविदा मागवून यशस्वी निविदाकाराची नियुक्ती करुन ३० वर्षाकरीता 'डी.एफ.बी.ओ.टी. तत्वावर सदर भूखंड वाटप करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. सदर जमीन आरजी-६, आरजी-१९, आरजी-२३ व टेकडी या जी-ब्लॉक मधील आर.जी.चा ताबा 'डी.एफ.बी.ओ.टी तत्वावर एजन्सीला देण्यात आल्यास जागतिक वित्तीय सेवा केंद्राकरीता लागणाऱ्या एकसंध व अनतिक्रमित ५० हे. जमिनीपैकी अंदाजे ६.८७ हे. भूखंडावर आर.जी. विकसित होणार असून त्यापैकी फक्त ०.६८७ हे. एवढया भूखंडावर मनोरंजन केंद्राचे बांधकाम होणार असून उर्वरित मोकळा भूखंड प्रस्तावित जागतिक वित्तीय सेवा केंद्र (आयएफएससी-सेझ) मधील नॉन प्रोसेसिंग झोनचा भाग म्हणून समाविष्ठ होईल या सापेक्ष हा भूखंड विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. प्राधिकरणाच्या जागतिक वित्तीय सेवा केंद्राच्या प्रस्तावास केंद्र शासनाकडून अद्यापी सकारात्मक प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. तथापि, आर.जी. चा वापर सर्वसाधारण लोकांसाठी करण्याची गरज असल्याने विषयांकित आर.जी. चे क्षेत्र प्रस्तावित जागतिक वित्तीय सेवा केंद्राचा भाग म्हणून विकसित करण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्याचे प्रस्तावित आहे. जेणेकरुन, जागतिक वित्तीय सेवा केंद्र (आयएफएससी-सेझ) तसेच विषयांकीत मनोरंजन मैदान हे दोन्ही प्रकल्प कार्यान्वित होतील. उपरोक्त ठरावाच्या यानुषंगाने प्राधिकरणाच्या स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

---

## अहमदनगर-करमाळा-टेंभुर्णी रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाबाबत

**(३०) ५६२३ (१३-११-२०२०) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर-करमाळा टेंभुर्णी या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या मंजूर कामाचे कंत्राट मे.कल्याण टोल इन्फ्रास्ट्रक्चर लि. या कंपनीला देण्यात आले असून संबंधित रस्त्याची रूंदी ४५ मीटर वरुन ६० मीटरपर्यंत करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरीत १५ मीटर जमिनीचे भूसंपादन करण्यात आले आहे काय, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर रस्त्याचे काम त्वरित सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०३-१२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

उर्वरित चौपदरीकरणाच्या कामासाठी शासनाने मे.कल्याण टोल इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना पर्यायी उद्योजक (Substitute) म्हणून नेमणेस मान्यता दिली आहे. सदरच्या चौपदरीकरणाच्या कामात रस्त्याची रुंदी ४५ मीटर वरुन ६० मीटर करणे प्रस्तावित नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उरण (जि.रायगड) येथील हनुमान कोळीवाडा येथील ग्रामस्थांचे फेर पुनर्वसन करण्याबाबत

**(३१) ५६३९ (१३-११-२०२०) श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४८६३४ ला दिनांक २६ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) येथील हनुमान कोळीवाडा ग्रामस्थ गत ३५ वर्षांपासून जेएनपीटी व केंद्र शासन तसेच राज्य शासन यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे फेर पुनर्वसाच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ३५ वर्षांपासून घरांना लागलेल्या वाळवीमुळे फेर पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असलेल्या हनुमान कोळीवाडा येथील ग्रामस्थांनी दिनांक २ ऑक्टोबर, २०२० रोजी जेएनपीटी आणि जिल्हाधिकारी, रायगड यांच्या विरोधात उरण तहसिल कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणताही निर्णय न झाल्यास दिनांक २१ जानेवारी, २०२१ पासून जेएनपीटी बंदरात समुद्र चॅनेलमधून येणारी मालवाहू जहाजे समुद्रात अडविण्यात येतील असा इशारा संबंधित ग्रामस्थांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार हनुमान कोळीवाडा येथील ग्रामस्थांचे फेर पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे आहे.

ग्रामसुधारणा मंडळ हनुमान कोळीवाडा यांच्यावतीने तहसिलदार, उरण यांच्या कार्यालयासमोर दिनांक ०२/१०/२०२० रोजी धरणे कार्यक्रमांतर्गत निवेदन देण्यात आले आहे.

(३) याबाबत जे.एन.पी.टी. कडे कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.

(४) व (५) जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट या केंद्र शासनाच्या प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाकडून उरण तालुक्यातील एकूण १२ गावातील एकूण २६१७ हे.आर. इतकी जमीन संपादित करण्यात आली होती. सदर १२ गावांपैकी बाधित झालेल्या कोळीवाडा गावाच्या गावठाणाचे पुनर्वसन बोरीपाखाडी (हनुमान कोळीवाडा) येथे करण्यात आले होते. तथापि, १९९६ मध्ये पुनर्वसित करण्यात आलेल्या घरांना वाळवी लागल्याचे निदर्शनास आल्याने व त्या ठिकाणी वाळवीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्याने सदर गावठाणाचे अन्य ठिकाणी दुबार पुनर्वसन करण्याची विनंती होत आहे.

विधानमंडळ विनंती अर्ज समितीने दिलेले निदेशानुसार, हनुमान कोळीवाडा गावाच्या पुनर्वसनासाठी जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांनी जमीन उपलब्ध करुन द्यावी व पुनर्वसनाची कार्यवाही करावी तसेच सध्याची जमीन जे.एन.पी.टी. ने ताब्यात घेऊन योग्य वापर करावा या सूचना विभागीय आयुक्त, कोकण विभाग, चेअरमन, जे.एन.पी.टी. व जिल्हाधिकारी, रायगड यांना दिनांक ८ नोव्हेंबर, २०१६ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

सदर गावाच्या पुनर्वसनाच्या अनुषंगाने जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांनी त्यांच्या दिनांक ५/१२/२०१६ च्या पत्रान्वये जमीन उपलब्ध करुन देण्यास असमर्थता व्यक्त केल्याने सदर गावाच्या पुनर्वसनासाठी नव्याने जमीन उपलब्ध करुन देण्याचे निर्देश जे.एन.पी.टी. ला देण्याची विनंती मा.मंत्री, केंद्रीय (पोत व परिवहन मंत्रालय) दिनांक ४ मे, २०१७ व दिनांक २९ मार्च, २०१९ रोजीच्या पत्रानुसार करण्यात आली आहे. हनुमान कोळीवाडा गावाच्या पुनर्वसनाची जबाबदारी जे.एन.पी.टी.ची आहे.

---

## मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेचे काम प्रलंबित ठेवणाऱ्या विकासकांवर दंडात्मक कारवाई करण्याबाबत

**(३२) ५६५५ (१३-११-२०२०) श्री.जयंत पाटील, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथे इरादा पत्र घेवूनही झोपडपट्टी पुनर्विकास योजनेचे काम सुरू न करणाऱ्या तसेच प्रकल्प प्रलंबित ठेवणाऱ्या विकासकांवर दंडात्मक कारवाई करण्याचा शासनाचा विचार असून तसा प्रस्ताव तयार करण्यात आला असूनही तूर्तास काहीही निर्णय घेण्यात आला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय असून प्रस्तावाबाबतची सद्य:स्थिती काय आहे तसेच प्रलंबित झोपु प्रकल्पांबाबत विकासकांवर दंडात्मक कारवाई करण्याकरीता किती कालावधी लागणे अपेक्षित असून झोपु प्रकल्पग्रस्तांना तात्काळ हक्काची घरे मिळण्याच्यादृष्टीने शासनामार्फत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड (०३-१२-२०२०) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

मा.मुख्यमंत्री महोदयांच्या समवेत दिनांक २४/०७/२०२० रोजी झालेल्या बैठकीमध्ये ज्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांतील पुनर्वसन घटकांच्या इमारतीचे बांधकाम बरीच वर्षे अनावश्यक कारणास्तव रखडलेले आहे. अशा विकासकांवर दंडनीय कारवाई करण्याबाबत धोरण निश्चित करण्याची बाब विचाराधीन आहे.

सद्य:स्थितीत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये ज्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अंमलबजावणीस विलंब झालेला आहे व विकासकाने झोपडीधारकांचे भाडे थकविले आहे, अशा योजनांमध्ये विकासकांविरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ चे कलम १३(२) नुसार विकासक काढण्याची कारवाई करण्यात येते. अशा प्रकारे मागील दोन वर्षात ६२ योजनांमध्ये विकासकांविरुध्द कारवाई करण्यात आलेली असून सहकारी गृहनिर्माण संस्थेस नवीन विकासक नियुक्तीची मुभा देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील नगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची अट शिथिल करणेबाबत**

**(३३) ५७२३ (१३-११-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची मर्यादा वर्ग-ब नगरपालिकेसाठी ५५% व वर्ग-क नगरपालिकेसाठी ६०% ठरवून दिलेली असल्यामुळे व नगरपालिकेचा खर्च सध्याच्या स्थितीत जास्त असल्याने अनुकंपा तत्वावरील लाभार्थ्यांना लाभ देणे शक्य होत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुकंपा तत्वावरील लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी नगरपालिका आस्थापना खर्चाची अट शिथिल करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, नगरपालिका आस्थापना खर्चाची अट शिथिल करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-१२-२०२०)** : (१) व (२) हे खरे नाही, अनुकंपा नियुक्ती योजनेंतर्गत केली जाणारी वारसाची नियुक्ती त्याच कर्मचाऱ्यांच्या रिक्त झालेल्या पदावर करण्यात येते त्यामुळे अनुकंपा तत्वावरील प्रकरणामध्ये आस्थापना खर्चाची मर्यादा लागू राहत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे महापालिकेच्या स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत भूमिगत पार्किंग प्रकल्पाचा फेरविचार करण्याबाबत

**(३४) ५७४२ (१३-११-२०२०) श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महापालिकेच्या स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत ठाणे शहरातील गावदेवी मैदानामध्ये रुपये २७ कोटींहून अधिक रक्कम खर्चून उभारला जात असलेल्या भूमिगत वाहनतळ प्रकल्पामुळे गावदेवी मैदानाचे मोठे नुकसान होऊन उक्त परिसरात वाहतूक कोंडीचा प्रश्न अधिक बिकट होत चालल्याच्या तक्रारी ठाणेकर आणि तज्ञ मंडळीनी केल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रक्रल्पाची रचना राष्ट्रीय इमारत संहितेकडे दुर्लक्ष करुन अतिशय धोकादायक पध्दतीने केली जात असल्याच्या तक्रारी ठाणेकरांनी महानगरपालिका आयुक्तांकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे शहरात मैदानांची संख्या कमी असल्यामुळे उक्त प्रकल्प उभारण्यात आल्यास ऐतिहासिक गावदेवी मैदान नष्ट होणार असून अरुंद असलेल्या नौपाड्यातील रस्त्यांवर वाहतूक कोंडी वाढण्याची शक्यता असल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी व महानगरपालिका आयुक्तांनी सदर भूमिगत पार्किंग प्रकल्पाचा फेरविचार करण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-१२-२०२०) :** (१) ठाणे महापालिकेच्या स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत ठाणे शहरातील गावदेवी मैदानामध्ये रुपये २६.४० कोटी एवढ्या खर्चाचा भूमिगत पार्किंग उभारण्याच्या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

सदर प्रकल्पामध्ये मैदानाचे नुकसान होऊन नौपाडा परिसरात वाहतूक कोंडी निर्माण होईल अशा आशयाची तक्रार आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये प्राप्त झाली आहे, हे खरे आहे.

तसेच सदर कामाविरोधात मा.उच्च न्यायालयात दाखल केलेली जनहित याचिका क्रमांक १०६८५/२०१९ मा.उच्च न्यायालयाने दिनांक २७/१०/२०२० रोजी निकाली काढली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे. अशी मागणी प्राप्त झाली होती.

(४) व (५) ठाणे शहरातील गावदेवी मैदानाच्या परिसरामध्ये मार्केट, दुकाने असल्यामुळे पार्किंग सुविधेमध्ये येणाऱ्या व जाणाऱ्या गाड्या फक्त वर्दळीच्या वेळी न येता अहोरात्र येणार व जाणार आहेत त्यामुळे नौपाडा परिसरातील बाजूच्या रस्त्यावर वर्दळीच्या वेळी वाहतुकीची कोंडी निर्माण होणार नाही.

तसेच भूमिगत पार्किंग व्यवस्था ही सीसीटीव्ही कॅमेरा युक्त तसेच वायुविजन प्रश्न मुक्त आणि अग्निशमन संसाधन युक्त आहे.

सदरील मैदानाचे क्षेत्रफळ ५६९० चौ.मी. असून, भूमिगत पार्किंगचे क्षेत्रफळ ४३१० चौ.मी. एवढे आहे. भूमिगत पार्किंगमध्ये वाहनांसाठी येण्या जाण्याच्या मार्गासाठी मैदानाचे क्षेत्रफळ २.२१% एवढे कमी होणार असून मैदानाचे कोणतेही नुकसान यामुळे होणार नाही.

तसेच सदर ठिकाणी भूमिगत पार्किंगचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर खेळाचे मैदान पूर्ववत करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर ठिकाणी भविष्यात खेळाचे मैदान उपलब्ध असणार आहे.

---

## ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो प्रकल्पाचे काम मूळ आराखड्याप्रमाणे सुरु करण्याबाबत

**(३५) ५७४५ (१३-११-२०२०) श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो मार्गाचे आरेखन नागरिकांच्या तक्रारीनंतर बदलण्यासाठी नव्याने सर्वेक्षण करण्याचे आदेश मा.नगर विकास मंत्री यांनी एमएमआरडीएला दोन महिन्यांपूर्वी दिले असून भिवंडीतील लोकप्रतिनिधींनी सदर आदेशाला विरोध करुन मूळ आराखड्याप्रमाणेच भिवंडी मेट्रो मार्ग करण्याची मागणी माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे आहे,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो प्रकल्पाचे काम मूळ आराखड्याप्रमाणे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-१२-२०२०) :** (१) व (२) माहे जानेवारी, २०२० मधील बैठकीदरम्यान मंत्री, नगर विकास तथा अध्यक्ष, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी मेट्रो मार्ग-५ (टप्पा-२ भिवंडी-कल्याण) या मार्गामध्ये वंजारपट्टी नाका, खडकपाडा, बिर्ला कॉलेज, शहाड आणि उल्हासनगर या क्षेत्रांचा समावेश करुन, प्राधिकरणामार्फत पुनर्विलोकन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार सदर भागांचा समावेश करण्यासाठी प्रकल्प मार्गिकेमध्ये

बदल करता येईल का अथवा सदर प्रकल्पाचा विस्तारीत मार्ग करता येईल का याबाबतची सुसाध्यता तपासून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी एम.एम.आर.डी.ए. मार्फत मे.दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (डी.एम.आर.सी.) यांची सल्लागार म्हणून माहे मे, २०२० मध्ये नियुक्ती करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत सदरचा अभ्यास डीएमआरसीमार्फत प्रगतीपथावर आहे.

तसेच, स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०२० च्या पत्रान्वये सदर मेट्रोचा मूळ मार्ग न बदलण्याबाबत कळविले होते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड नगरपरिषद नागरिकांना तब्बल १५ दिवसांनी पाणीपुरवठा करीत असल्याबाबत**

**(३६) ५७९० (१३-११-२०२०) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड शहरामध्ये माजलगा धरण व बिंदूसुरा धरण, पाली (ता.जि.बीड) येथून पाणीपुरवठा केला जात असून दोन्ही धरण या वर्षी पुरेसा पाऊस पडल्यामुळे पूर्णपणे भरलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही धरणे पूर्णपणे पाण्याने भरलेली असताना बीड नगरपरिषद नागरिकांना तब्बल १५ दिवसांनी पाणीपुरवठा करीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त धरणात मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध असतानाही बीड शहरातमध्ये अपुरा पाणीपुरवठा करण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) बीड नगरपरिषदेस माजलगाव व बिंदुसरा धरणातून पाणीपुरवठा केला जातो.

बीड शहराची हद्दवाढ झाल्याने पाणीपुरवठा व्यवस्थेवर ताण निर्माण झाला आहे. त्यामुळे शहरास सद्य:स्थितीस ६ दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे.
(३) व (४) बीड शहरास नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत बीड शहरास रुपये ११४.१९ कोटींचा पाणीपुरवठा प्रकल्प मंजूर करण्यात आला असून सदरील प्रकल्पाचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यामार्फत प्रगती पथावर आहे.

सदरील प्रकल्पाचे काम मार्च, २०२१ अखेर पूर्ण करून नियमित पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे.

---

**बीड येथील बिंदूसुरा नदीमध्ये शहरातील घंटागाड्यावद्वारे जमा केलेला कचरा टाकण्यात येत असल्याबाबत**

**(३७) ५७९१ (१३-११-२०२०) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड शहराच्या मध्यवर्ती भागातून वाहणाऱ्या बिंदूसुरा नदीमध्ये नगरपरिषद स्वछता विभाग प्रचंड प्रमाणात शहरातील घंटागाड्यावद्वारे जमा केलेला कचरा टाकत असल्याच्या तक्रारी विविध सामाजिक कार्यकर्ते, संस्थांमार्फत करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बीड नगरपरिषद व कचऱ्याचे कंत्राट घेतलेल्या कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

अशा आशयाची तक्रार प्राप्त झालेली नसल्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी अहवाल सादर केला आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, कचरा नदीपात्रात टाकू नये म्हणून कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून, नदीपात्रात कोणत्याही प्रकारे कचरा पडणार नाही, याची दक्षता घेण्यात येत असल्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी अहवालात नमूद केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सफाई कामगारांच्या आर्थिक उन्नतीसाठी लाड/पागे समितीने केलेल्या शिफारशींबाबत

**(३८) ५७९६ (१३-११-२०२०) श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सफाई कामगारांच्या आर्थिक उन्नतीसाठी लाड/पागे समितीने केलेल्या शिफारशींबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकात दुरुस्ती करण्यात आली नसल्यामुळे सदर परिपत्रकातील नमूद अटींमुळे वारसदारांना त्यांच्या हक्कांपासून वंचित रहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाड समितीच्या शिफारशींतर्गत वारसदारांना लाभ मिळवून देताना नियम व अटी शिथिल करण्याचा अधिकार प्रशासनाला दिला असूनही प्रशासन उक्त बाबींकडे लक्ष देत नसल्याची लेखी तक्रार/निवेदन लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कामगाराच्या मृत्यूनंतर वारसदारास लाभ मिळवून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-१२-२०२०) :** (१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, दिनांक २४ फेब्रुवारी, २०१४ व दिनांक ११ मार्च, २०१६ रोजीच्या परिपत्रक/शासन निर्णयातील तरतुदीनुसार सफाई कामगारांच्या वारसदारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येते. त्यात नमूद केलेल्या नियमातील अटी व शर्ती शिथिल करावयाचा प्रस्ताव असल्यास सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची मान्यता घेवून अशी कार्यवाही करण्यात येते.

(२) व (३) प्रश्न-२ भाग मध्ये नमूद केलेले निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. मात्र नियम व अटी शिथिल करण्याबाबतच्या विशिष्ट प्रस्तावांची यादी शासनास उपलब्ध करुन देण्यात आल्यास ते तपासून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास अभिप्रायार्थ/सहमतीस्तव पाठविण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला महानगरपालिकेमध्ये भूमिगत गटार योजना गैरकायदेशीररित्या राबविण्यात येत असल्याबाबत

**(३९) ५८०२ (१३-११-२०२०) श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक ४१५४९ ला दिनांक ११ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेमध्ये भूमिगत गटार योजना पूर्णपणे गैरकायदेशीररित्या राबविण्यात येत असल्यामुळे सन २०१८ च्या हिवाळी अधिवेशनात मा.मंत्री महोदय यांनी सदर कामाला स्थगिती आदेश देत असल्याची घोषणा सभागृहात केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूमिगत गटार योजनेला स्थगिती आदेश असतानाही अकोला महानगरपालिका प्रशासनामार्फत भूमिगत गटारीचे काम सुरू असून उक्त योजनेवर आजपावेतो कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांना स्थगिती आदेश असतानाही काम सुरु राहण्याची कारणे काय असून उक्त प्रकरणी महानगरपालिकेकडे तक्रार करूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) सन २०१८ च्या हिवाळी अधिवेशनात दिनांक १७/०७/२०१८ रोजी तत्कालीन मा.पर्यावरण मंत्री महोदय यांनी सदर कामाला स्थगिती आदेश देत असल्याची घोषणा सभागृहात केली होती.

त्यानंतर सदरील स्थगितीच्या अनुषंगाने तत्कालीन मा.पर्यावरण मंत्री यांनी अकोला महानगरपालिकेच्या भूमिगत गटार योजना व सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेच्या कामाची तपासणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पाटबंधारे विभागांमधील अधिकारी तसेच, विशेष आमंत्रित सदस्य यांची समिती गठीत करण्यात आली होती.

सदर समितीचा अहवाल सचिव, पर्यावरण विभाग यांना सादर केल्यानंतर संचालक पर्यावरण विभाग यांच्या दिनांक १३/११/२०१८ रोजीच्या पत्रान्वये उक्त स्थगिती उठविण्यात आली.

सदरील घोषणेनुसार दिनांक १७/०७/२०१८ ते १३/११/२०१८ या स्थगिती कालावधीमध्ये योजनेचे कोणत्याही प्रकारचे काम करण्यात आले नव्हते.

तद्नंतर सदर योजनेची कामे सुरु करण्यात आली असून सध्या कामे प्रगतीपथावर आहेत.

---

## अकोला महापालिकेतील आर्थिक गैरव्यवहाराबाबत

**(४०) ५८०६ (१३-११-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेमध्ये स्वच्छ भारत योजनेंतर्गत शौचालयाचे बांधकाम करण्याकरीता तसेच इतर विविध कामांकरीता केंद्र व राज्य शासनाकडून निधी प्राप्त झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला महापालिकेत गतवर्षी प्राप्त अनुदान रक्कमेपैकी २९ कोटींचा वैयक्तिक शौचालयातील आर्थिक गैरव्यवहार, २० कोटी रुपयांचे निकृष्ट एलईडी पथदिवे, ५३ लाखाची सायकल खरेदी, ७० हजार रुपयांचा हळदीकुंक कार्यक्रम तसेच निकृष्ट रस्ते, गटार योजना, अमृत योजना व बोगस देयके प्रकरण इत्यादी बाबींवर कोटयवधी रुपये खर्च केल्याचे दाखवून अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार केल्याचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी घरगुती शौचालय बांधकामामध्ये S.B.M. मार्फत निर्देशित केलेल्या गाईड लाईनचे उल्लंघन तत्कालिन संबंधित अधिकाऱ्यांकडून करण्यात आले असून शौचालय बांधकामाची रक्कम लाभधारकांच्या खात्यामध्ये जमा न करता त्यांच्या प्रतिनिधींच्या खात्यामध्ये २८७.४३ लक्ष रक्कम बेकायदेशीररित्या जमा करण्यात आल्याची तक्रार महापालिकेतील नगरसेवकांनी महानगरपालिका प्रशासनाकडे लेखी व मौखिकरित्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-१२-२०२०) :** (१) स्वच्छ भारत योजनेंतर्गत शौचालयाचे बांधकामाकरीता केंद्र व राज्य शासन मिळून, दिनांक २४/०९/२०१५ ते दिनांक २०/११/२०२० अखेर एकूण रुपये २४.५६ कोटी इतका आणि राज्य शासनाकडून मूलभूत सोयी सुविधाकरीता सन २०१६-२०१७ मध्ये रुपये १० कोटी इतका निधी महापालिकेकडे प्राप्त झालेला असल्याचे महापालिकेच्या अहवालात नमूद आहे.

(२), (३) व (४) प्रश्नात नमूद, वैयक्तिक शौचालय, निकृष्ट एलईडी पथदिवे, निकृष्ट रस्ते, भुयारी गटार योजना, अमृत योजनेतील भ्रष्टाचार व चौकशीसंदर्भात सन्माननीय लोकप्रतिनिधींनी विधानमंडळाच्या विनंती अर्ज समितीकडे तक्रार अर्ज सादर केला होता. समितीने या अनियमिततेच्या तक्रारीबाबत चौकशीसाठी सन्माननीय लोकप्रतिनिधी श्री.गोपिकिसन बाजोरिया, वि.प.स. यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती नियुक्त केली आहे. तर, इतर मुद्यांबाबत खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे. :-

**सायकल खरेदी** :- महापालिकेची आर्थिक परिस्थिती पहाता, सदर योजनेची अंमलबजावणी करणे संयुक्तीक नसल्याचे सभागृहात मत व्यक्त झाल्याने, सदरचा विषय दिनांक २८/०७/२०२० च्या सभेत स्थगीत ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे या योजनेची अंमलबजावणी अकोला महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आलेली नाही.

**हळदीकुंकू कार्यक्रम** :- याबाबत गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीच्या अहवालाच्या आधारे, पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली असल्याचे, महापालिकेच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला महानगरपालिकेतील सर्वसाधारण सभेच्या ठरावामध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(४१) ५८१४ (१३-११-२०२०) श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेमध्ये दिनांक ०१ एप्रिल, २०१७ ते आजपावेतो घेण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेच्या ठरावामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याची तक्रार महापालिकेमधील नगरसेवकांनी शासनाकडे तसेच आयुक्त व जिल्हाधिकारी यांचेकडे केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिका प्रशासन, जिल्हा प्रशासन व शासनाकडून कोणत्या स्वरुपाची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-१२-२०२०)** : (१), (२) व (३) अकोला महानगरपालिकेच्या सन्माननीय नगरसेवक यांनी शासनाकडे दिनांक ०८/०९/२०२० आणि दिनांक ०७/०९/२०२० रोजीच्या दोन पत्रान्वये, अकोला महानगरपालिकेच्या दिनांक ०२/०९/२०२० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या सभेमध्ये आणि दिनांक ०२/०७/२०२० रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये चर्चेविना पारित झालेला ठराव विखंडीत करण्याबाबत मागणी केलेली असून, यासंदर्भात विभागीय आयुक्त, अमरावती विभाग यांचेकडून चौकशी अहवाल मागविण्यात आलेला होता. दिनांक ११/११/२०२० च्या पत्रान्वये या प्रकरणीचा अहवाल शासनाकडे प्राप्त झालेला असून, त्यानुसार वरील दोन्ही सभांमध्ये विहित नियमांचे पालन न होता, काही ठराव मंजूर झाल्याचे सकृतदर्शनी दिसते. यासंदर्भात उचित कार्यवाही शासनस्तरावर करण्यात येत आहे.

---

## बीड शहरात अमृत अटल योजनेंतर्गत सुरु असलेल्या भुयारी गटाराचे कामाबाबत

**(४२) ५८१८ (१३-११-२०२०) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड शहरात अमृत अटल योजनेंतर्गत भुयारी गटाराचे काम चालू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना विलंबाने सुरु असून शहरातील नागरिकांना गत २ वर्षांपासून गटाराच्या बांधकामासाठी रस्ते खोदणे व इतर कामांमुळे प्रचंड शारीरिक, मानसिक व पर्यायाने आर्थिक त्रासाचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान काही अपघात घडले असून त्यामध्ये २ पेक्षा अधिक जणांचा बळी व कित्येक जण गंभीररित्या जखमी झाल्याच्या तक्रारी शहरातील पोलीस ठाण्यांमध्ये नोंदविण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी कंत्राटदारावर कारवाई करुन त्याला काळ्या यादीत टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदरील मलनिस्सारण प्रकल्पाच्या कामासाठी खोदकाम करताना आवश्यक सूचना फलक तसेच बॅरिकेट्स यांचा वापर करून नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही याची आवश्यक खबरदारी घेण्यात येत आहे. तसेच खोदकामाचे काम पूर्ण झाल्यानंतरच सदर रस्ता रहदारीसाठी खुला करण्यात येत आहे.

सदर प्रकल्पाची कार्यान्वयन यंत्रणा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही असून त्यांच्यामार्फत याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रकल्पाचे काम चालू असताना प्रत्यक्ष कामाच्या स्थळावर दोन जणांचा आकस्मात मृत्यू झाल्याची नोंद शहरातील पोलीस ठाण्यात आहे, हे खरे आहे.
(४) व (५) काम सुरु झाल्यापासून सद्य:स्थितीपर्यंत बीड शहर पोलीस ठाणे व शिवाजीनगर बीड पोलीस ठाणे अंतर्गत दोन तक्रारी प्राप्त असून त्यामध्ये दोन जणांचा आकस्मात मृत्यूची नोंद असून या व्यतिरिक्त कोणीही गंभीर जखमी झालेले नाही.

सदरील दोन आकस्मित मृत्यूबाबतचा पुढील तपास पोलीस खात्यामार्फत चालू असून मृत्यूस कंत्राटदार जबाबदार असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कंत्राटदारावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

---

## अकोला, वाशिम आणि बुलढाणा जिल्ह्याला जोडणाऱ्या शेगांव पालखी मार्गाच्या सुधारणा कामात कंत्राटदाराने गैरव्यवहार केल्याबाबत

**(४३) ५८३४ (१३-११-२०२०) श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हायब्रिड ॲन्युटी अंतर्गत अकोला, वाशिम आणि बुलढाणा जिल्ह्याला जोडणाऱ्या शेगांव पालखी मार्गाच्या सुधारीत कामाकरीता सुधीर कंन्ट्रक्शन ईन्फ्रास्पेस (शेगांव पालखी मार्ग) प्रा. लिमिटेड या कंत्राटदाराला माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये Mobilization advance रूपये १८.५५ कोटी देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीने आजपावेतो आपले काम पूर्ण केले नसून रस्त्याच्या कामात कंत्राटदाराने गिट्टी ऐवजी मोठमोठे दगड (बोल्ड्र्स) वापरणे, झाडाच्या मुळा न काढणे, सुरक्षिततेचे नियम न पाळणे, पर्यायी मार्ग न काढणे, रस्ते बांधकामात काळ्या व ओल्या मातीचा वापर करणे तसेच रस्त्याच्याकडेला मातीची मोठमोठी ढिगारे टाकण्यात आल्याबाबतची मौखिक व लेखी तक्रार संबंधित विभागाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी कंत्राटदारांवर कारवाई करुन सदर रस्त्याचे काम उत्कृष्ट दर्जाचे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (०१-१२-२०२०) :** (१) होय.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड शहरातील रस्त्यांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४४) ५८३६ (१३-११-२०२०) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड शहरातील पिंपरगव्हाण रोड, कॅनॉल रोड, शाहू नगर, मोंढा रोड, एमआयडीसी परिसर, भारतरत्न डॉ.आंबेडकर चौक, हिरालाल चौक या भागातील रस्त्याचे काम जाणीवपूर्वक अपूर्णावस्थेत ठेवून संबंधित कंत्राटदाराने काम थांबविले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी विविध सामाजिक कार्यकर्ते व शहरातील नागरिकांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अपूर्ण कामांमुळे शहरातील नागरिकांची प्रचंड गैरसोय होत असून सर्वत्र खोदकाम केल्यामुळे पावसाळ्यात प्रवास जिकरीचा होवून अपघाताचे प्रमाणही वाढले आहे तसेच घरात पावसाचे पाणी शिरत असल्यामुळे रोगराईचे प्रमाणही वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित कंत्राटदारावर कारवाई करुन संबंधित रस्त्यांची कामे त्वरीत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-१२-२०२०)** : (१) हे खरे नाही.

सदर भागातील रस्त्यांची कामे कोरोनाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव पसरलेला असल्याने, सदर कामे प्रलंबित होती. सद्य:स्थितीत कामे सुरु करण्यात आलेली असल्याबाबत मुख्याधिकारी, बीड नगरपरिषद यांनी अहवाल सादर केला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) शहरातील सदर रस्त्यांची कामे विनाविलंब पूर्ण करण्यासंदर्भात संबंधितांना सूचना देण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कर्मचा-यांच्या संख्येत वाढ करण्याऐवजी पदे कमी केल्याबाबत

**(४५) ५८७९ (१३-११-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) माध्यमातून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दहा वर्षात ५ लाखांहून २६ लाखांपर्यंत वाढली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त अतिरिक्त कामाचा ताण लक्षात घेता लोकसेवा आयोगाच्या कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ करण्याऐवजी १६ पदे कमी केल्याने कर्मचाऱ्यांच्या संख्येत घट झाली असल्यामुळे सदर आयोगाचे कामकाज अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे पुरेशा प्रमाणात होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार राज्य लोकसेवा आयोगाची सर्व पदे पूर्ववत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०१-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

सर्व प्रशासकीय विभागांच्या पदांचा आढावा घेताना वित्त विभागाने वर्षानुवर्षे रिक्त असलेली पदे निरसित केली आहेत. या निकषाच्या आधारेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची देखील रिक्त पदे निरसित करण्यात आली. निरसित पदे ही प्रामुख्याने गट क व गट ड संवर्गाची असून शिपाई व हमाल यांच्या सेवा बाह्य यंत्रणेमार्फत घेण्यात येतात. ही बाब विचारात घेवून त्याच संवर्गातील केवळ रिक्त असलेली पदे निरसित करण्यात आलेली आहेत.
(३) रिक्त पदे निरसित करण्याबाबतचा निर्णय ही बाब प्रशासकीय कामकाजाचा भाग असल्यामुळे याबाबत चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कामाचा संविधानिक दर्जा व कामाची गोपनियता इत्यादी बाबी विचारात घेवून आयोगास भविष्यात कामाच्या अनुषंगाने आकृतिबंधात बदल अपेक्षित असल्यास मा.अध्यक्ष, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांनी योग्य त्या समर्थनासह प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई विमानतळ प्राधिकरणाच्या जमिनीवरील झोपडपट्टीवासियांचे पुनवर्सन करण्याबाबत

**(४६) ५९५७ (१३-११-२०२०) श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विमानतळ प्राधिकरणाच्या जमिनीवरील झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्याकरीता सध्या अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्यामार्फत कार्यवाही सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यवाहीत जे अंशतः पात्र आहेत त्यांना म्हाडा येथील उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्का) अंधेरी-१ यांच्याकडे अर्ज करण्यास सांगितले जात आहे व जे अपील केल्यानंतरही अपात्र आहेत त्यांना ओल्ड कस्टम हाऊस, फोर्ट येथे अपील करण्यास सांगण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव पसरला असताना शासनाच्या आदेशानुसार झोपडीधारकांना आपले घर वाचविण्याकरीता अंधेरी व फोर्ट येथील कार्यालयामध्ये सतत ये-जा करावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सध्या कोरोनाचे संकट पाहता अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्यामार्फत सुरु असलेल्या कार्यवाहीत शिथिलता आणून ज्या झोपडीधारकांच्या अपीलावर अप्पर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्का) यांनी मान्यता दिली आहे अशा सर्व झोपडीधारकांना सरसकट पात्र करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर विचाराधीन प्रस्तावावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड (०३-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सक्षम प्राधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (अति/निष्का.), अंधेरी-१ यांचेकडे अपात्र ठरलेल्या झोपडीधारकांना अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का.), पश्चिम उपनगरे यांचेकडे प्रथम अपील व तक्रार निवारण समिती यांचेकडे व्दितीय अपील दाखल करता येते.

अपिलामध्ये अंशत: पात्र ठरलेल्या झोपडीधारकांची कागदपत्रे तपासून सक्षम प्राधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (अति/निष्का.), अंधेरी-१ यांचेकडून निर्णय घेण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

___

## देवळा (जि.नाशिक) नगरपंचायतीने एक योजना कार्यरत असताना दुसऱ्या योजनेस मंजूरी मिळवून गैरव्यवहार केल्याबाबत

**(४७) ६०४३ (२०-११-२०२०) श्री.विनायकराव मेटे** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळा (जि.नाशिक) शहरासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना व फिल्ट्रेशन प्लांटचे काम सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात पूर्ण झाले असून सदर कामावर शासनाने जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून सुमारे ४५० लक्ष रुपये खर्च केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ४५० लक्ष रुपयांची योजना देवळा जिल्हा परिषदेने नगरपंचायतीकडे वर्ग केले नसतानाही पाण्याचा पुरवठा केला जात असून देवळा नगरपंचायत वीज बिलापोटी दरमहा १ लाख ५० हजार रुपये खर्च करीत आहे तसेच उक्त योजना वापरण्यास देवळा नगरपंचायतीने नाशिक जिल्हा परिषदेकडून कोणतीही परवानगी घेतली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचे पाणी नागरिकांसाठी पिण्यायोग्य आहे किंवा कसे याचा अहवाल देवळा नगरपंचायतीकडे उपलब्ध नसून देवळा नगरपंचायतीने वरिष्ठ कार्यालयाची कोणतीही परवानगी न घेता वीज बील व कर्मचारी असे मिळून महिन्याकाठी ३ लाख रुपये तर वर्षाला ३६ लाख रुपये खर्च करीत असून नगर विकास विभागाकडे सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाचा प्रस्ताव सादर करतेवेळी सदर योजनेचा उल्लेख जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक टाळला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, देवळा नगरपंचायतीने एक योजना कार्यरत असताना दुसरी योजना नगर विकास विभागाच्या सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेच्या माध्यमातून माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये मंजूर करून सुमारे ९ कोटी ५० लाख रुपयांचा निधीस मान्यता घेवून शासनाची दिशाभूल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने देवळा नगरपंचायतीवर व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिकाऱ्यांवर कारवाई करुन नव्याने संमत झालेल्या ९ कोटी ५० लक्ष रुपयांच्या योजनेच्या कामास स्थगिती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-१२-२०२०) :** (१) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत देवळा ग्रामपंचायतीच्या दिनांक १५/०८/२००९ रोजीच्या ग्राम सभेतील ठराव क्र. ०३ नुसार प्राप्त झालेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार ग्रामीण पाणीपुरवठा योजना जिल्हा परिषद, नाशिक यांच्या माध्यमातून तत्कालीन देवळा ग्रामपंचायतीने राबविली आहे.

सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यामार्फत राबविण्यात आलेली नाही.
(२) दिनांक १० मार्च, २०१५ रोजी देवळा नगरपंचायतची स्थापना झालेली आहे.

तांत्रिक दृष्ट्या सदर योजना जरी जिल्हा परिषदेने नगरपंचायतीकडे वर्ग केली नसली तरी त्या क्षेत्रामध्ये नगरपंचायत स्थापन झाल्यामुळे सदर योजना देवळा नगरपंचायतीने पुढे कार्यान्वित ठेवली असून याबाबतच्या वीज बिलाचा खर्च सुध्दा नगरपंचायतीने स्वनिधीतून केला आहे, हे खरे आहे.
(३) सदर योजनेचे पाणी नागरिकांसाठी पिण्यायोग्य असल्याबाबतचे अहवाल देवळा नगरपंचायतीकडे उपलब्ध आहेत.

तसेच शहराला आवश्यक पाणीपुरवठा करण्याकरीता वीज बिल व कंत्राटी कर्मचारी असे मिळून महिन्याला रुपये ३ लाख व वर्षाला रुपये ३६ लाख इतका खर्च स्वनिधीतून देवळा नगरपंचायत करीत आहे.

शासनाकडे सन २०१५-२०१६ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्रस्ताव सादर केला नसल्याने सदर योजनेचा उल्लेख टाळण्याचा प्रश्न उद्‍भवत नाही.

(४) (५) व (६) देवळा गावासाठी जिल्हा परिषद नाशिक यांच्या माध्यमातून तत्कालीन देवळा ग्रामपंचायतीने ग्रामीण भागासाठी असलेल्या ४० लिटर दरडोई दर दिवशी या मापदंडाप्रमाणे राबविलेली आहे.

तथापि, दिनांक १० मार्च, २०१५ रोजी देवळा ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रुपांतर झाले आहे.

देशातील पाणीपुरवठा व स्वच्छता विषयक धोरण ठरविण्याच्या अनुषंगाने देशपातळीवर कार्यरत तांत्रिक संस्थेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार नगरपंचायत भागातील नागरिकांना दरदिवशी ७० लिटर पाणीपुरवठा करण्याबाबतचा मापदंड स्वीकारण्यात आला आहे.

त्यानुषंगाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत देवळा नगरपंचायतीच्या रुपये ९.७२ कोटी रुपये किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली असून सदरील प्रकल्पाचे देवळा नगरपंचायतीने कार्यादेश देण्यात आले असून प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

---

## राज्यातील माहिती आयुक्तांचे पद रिक्त असल्याबाबत

**(४८) ६०६० (१३-११-२०२०) श्री.रमेश कराड, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे पन्नास हजारापेक्षा अधिक माहितीच्या अधिकारामार्फत सादर केलेली प्रकरणे प्रलंबित असून विभागीय माहिती आयुक्तांच्या ३ पदांसह अन्य पदे गत अडीच वर्षांपासून रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बृहन्मुंबई कोकण, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर आणि पुणे या सात महसूल विभागांसाठी ज्यांना माहिती अधिकार कायद्याची जाण आहे, सामाजिक क्षेत्रात ज्यांनी उल्लेखनीय काम केले आहे तसेच लोकशाहीतील अधिकार व कर्तव्य याबाबत स्पष्ट विचार असलेल्या अनुभवी व्यक्तींची विभागीय माहिती आयुक्त म्हणून नेमणूक करण्याचे अधिकार, माहिती अधिकार कायद्यानुसार शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विभागीय माहिती आयुक्तांचे रिक्त पद न भरण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०३-१२-२०२०) :** (१) होय, खरे आहे.

राज्य माहिती आयोग, मुख्यालय व अन्य खंडपीठाकडे सप्टेंबर, २०२० अखेर ५१०१३ व्दितीय अपिले प्रलंबित आहेत.

राज्य माहिती आयुक्त, पुणे, नाशिक व नागपूर ही ३ पदे अनुक्रमे दिनांक ३/११/२०१८, दिनांक २१/०२/२०१९ व दिनांक १/०६/२०१८ पासून रिक्त आहेत.

(२) राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांच्या नियुक्तीबाबत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १५ (३), कलम १५ (५) व कलम १५ (६) मधील तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

- १५(३) - “राज्य मुख्य माहिती आयुक्ताची आणि राज्य माहिती आयुक्तांची नियुक्ती, राज्यपाल, पुढील व्यक्तींची मिळून बनलेल्या समितीच्या शिफारशीनुसार करील –
- मुख्यमंत्री, जी या समितीची अध्यक्षपदीय व्यक्ती असेल;
- (दोन) विधानसभेतील विरोधी पक्षनेता; आणि
- मुख्यमंत्र्याने नामनिर्देशित करावयाचा एक कॅबिनेट मंत्री.

  स्पष्टीकरण - शंकानिरसनार्थ, याव्दारे, असे घोषित करण्यात येते की, विधानसभेतील विरोधी पक्षनेता म्हणून एखाद्या व्यक्तीला मान्यता देण्यात आली नसेल त्याबाबतीत, विधानसभेतील सरकारच्या विरोधी पक्षातील सर्वात मोठ्या गटाच्या नेत्यास विरोधी पक्षनेता मानण्यात येईल.”
- १५(५) - राज्य मुख्य माहिती आयुक्त आणि राज्य माहिती आयुक्त हे कायदा, विज्ञान व तंत्रज्ञान, समाजसेवा, व्यवस्थापन, पत्रकारिता, जनसंपर्क माध्यम किंवा प्रशासन आणि शासन या विषयांचे व्यापक ज्ञान व अनुभव असलेल्या सार्वजनिक जीवनातील प्रख्यात व्यक्ती असतील.

- १५(६) राज्य मुख्य माहिती आयुक्त किंवा कोणताही राज्य माहिती आयुक्त, हा यथास्थिती, संसदेचा सदस्य किंवा कोणत्याही राज्याच्या, किंवा संघ राज्यक्षेत्राच्या विधानमंडळाचा सदस्य असणार नाही, किंवा इतर कोणतेही लाभपद धारण करणार नाही, किंवा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित असणार नाही किंवा कोणताही उद्योग धंदा अथवा व्यवसाय करणार नाही.

(३) राज्य माहिती आयुक्तांची तीन रिक्त पदे भरण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयात, श्रीमती अंजली भारद्वाज व इतर यांनी केंद्र शासनाविरुध्द दाखल केलेल्या रिट याचिका (सिव्हील) क्र. ४३६/२०१८ प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १३/१२/२०१८ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशाच्या अनुपालनाकरीता राज्य मुख्य माहिती आयुक्त/राज्य माहिती आयुक्त पदावरील नियुक्तीसाठी महाराष्ट्र राज्यातील नियुक्ती समितीस सहाय्य करण्यासाठी शासन निर्णय, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये शोध समिती (Search Committee) स्थापन केली आहे.

सदर शोध समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, राज्य माहिती आयुक्त यांची ३ रिक्त पदे भरण्याकरीता दिनांक ७ जून, २०१९ रोजी वर्तमानपत्रात व शासनाच्या संकेतस्थळावर यासाठीची तपशीलवार जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीस अनुसरुन अर्ज प्राप्त झाले होते.

त्यानंतर केंद्र शासनाने दिनांक २४/१०/२०१९ च्या अधिसूचनेन्वये राज्य मुख्य माहिती आयुक्त/राज्य माहिती आयुक्त यांच्या वेतन, भत्ते, पदावधी व अन्य सेवाशर्तीमध्ये बदल केला आहे. सेवाशर्तीमधील सदर बदल संबंधित अर्जदारांच्या निदर्शनास आणण्यासाठी व राज्य माहिती आयुक्त पदासाठी अर्ज व इच्छूकता कायम ठेवण्याबाबत वर्तमानपत्रात व शासनाच्या संकेतस्थळावर दिनांक २०/०२/२०२० रोजी जाहिरात देण्यात आली होती.

त्यानंतर व्हिडीओ कॅान्फरन्सव्दारे दिनांक ५/०८/२०२०, दिनांक ४/०९/२०२० व दिनांक १०/०९/२०२० रोजी शोध समितीच्या बैठका झाल्या आहेत.

माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम १५(३) मधील तरतुदीनुसार, मा.राज्यपालांना राज्य मुख्य माहिती आयुक्त आणि राज्य माहिती आयुक्त नेमण्याची शिफारस करण्यासाठी, शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ५ ऑक्टोबर, २०२० अन्वये, मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे त्रिसदस्यीय समिती गठीत केली आहे.

१. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य... अध्यक्ष;

२. विरोधी पक्षनेता, विधान सभा, महाराष्ट्र राज्य... सदस्य;

३. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य... सदस्य.

उपरोक्त समितीच्या शिफारशीनंतर मा.राज्यपाल महोदयांच्या मान्यतेनंतर राज्य माहिती आयुक्तांची नियुक्ती करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपरी-चिंचवड शहरातील रुग्णालयांनी कोरोना साथीच्या काळात रुग्णांची आर्थिक लूट केल्याबाबत

**(४९) ६०७२ (२०-११-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड शहरातील २७ रुग्णालये कोरोना साथीच्या काळात रुग्णांची आर्थिक लूट करीत असल्याचे आढळून आल्यामुळे महापालिकेने सदर रुग्णालयावर कारवाई केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महापालिकेने एकूण १६४१ रुग्णांच्या देयकांची तपासणी दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० पर्यंत पूर्ण केली असून त्यात १४०६ जणांची देयके वाढीव दराची असल्याचे आढळून आल्यामुळे रुपये २ कोटी ३० लाखाची रक्कम रुग्णांना परत करण्याचे निर्देश महापालिकेने देऊनही अद्याप उक्त रुग्णांना त्यांच्या देयकाची रक्कम परत मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार रुग्णांच्या देयकांची रक्कम परत करण्याबाबत कार्यवाही करुन सदर रक्कम परत न करणाऱ्या दोषी रुग्णालयांवर महापालिकेने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-१२-२०२०) :** (१) पिंपरी-चिंचवड शहरात वाढीव बिलांची आकारणी करत असणारी ३१ खाजगी रूग्णालये आढळून आली असून त्यापैकी २१ रूग्णालयांवर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. उर्वरित १० रूग्णालयांवर कारवाई प्रस्तावित आहे. तसेच अन्य ११ खाजगी रूग्णालयांची तपासणी सुरू आहे.

याबाबत दिनांक ९/१०/२०२० रोजी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस स्थानिक विधानसभा सदस्यांनी पत्र पाठविलेले आहे.

(२) व (३) दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० पर्यंत एकूण १६४१ रूग्णांच्या देयकांची तपासणी पूर्ण करण्यात आली असून त्यामध्ये १४०६ रूग्णांची देयके वाढीव दराची असल्याचे आढळून आले आहे.

त्यामुळे वाढीव रक्कम रूग्णांना परत करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत रूग्णालयांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

वाढीव आकारलेली रूपये २ कोटी ३० लाख एवढी रक्कम रूग्णांना परत करावयाची असून त्यापैकी एकूण रुपये ९,२९,१४३/- एवढी रक्कम रूग्णांना परत करण्यात आलेली आहे.

ज्या खाजगी रूग्णालयांनी कोविड-१९ रूग्णांच्या उपचारार्थ जादा रक्कम आकारणी केली आहे, अशी रक्कम अद्यापही परत केली नसल्यास त्याबाबतचा खुलासा सादर करण्याबाबत तसेच या प्रकरणी टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ व बॉम्बे नर्सिंग ॲक्ट, १९४९ मधील तरतूदीनुसार कायदेशीर कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत, असे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंढरपूर नगरपरिषदेस (जि.सोलापूर) अनुदानाची रक्कम प्राप्त न झाल्याबाबत

**(५०) ६१०५ (२०-११-२०२०) श्री.प्रशांत परिचारक, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर नगरपरिषदेला (जि.सोलापूर) शासनाकडून विविध प्रकारे मिळणाऱ्या अनुदानाची रक्कम तसेच टाळेबंदीच्या काळामध्ये उक्त ठिकाणी सर्व व्यवहार बंद असल्याने नगरपरिषदेस करपोटी मिळणारी रक्कम मिळाली नसल्यामुळे सदर नगरपरिषद आर्थिक अडचणीत सापडली असून कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंढरपूर नगरपरिषदेत सन १९७८ पासून सुरू करण्यात आलेल्या यात्रा अनुदानाची रक्कम ६,५२,५९,०००/- तसेच सहायक वेतन अनुदान रक्कम ९,४२,६०,६४१/- इतकी रक्कम शासनाकडून येणे बाकी असून कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची रक्कमही अद्यापपर्यंत मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंढरपूर नगरपरिषदेला शासनाकडून अनुदानापोटी येणारी रक्कम न मिळाल्याने भाविकांना सेवासुविधा देण्याबाबत जी कामे केलेली आहेत त्यांची देयके, कर्मचाऱ्यांची देयके, विशेष म्हणजे निवृत्त कर्मचाऱ्यांची देयके देण्यासाठी नगरपरिषदेकडे पैसे शिल्लक नसल्यामुळे उक्त प्रकरणी शासनाकडे अनेक वेळा पत्र व्यवहार करूनही सदर अनुदानाची रक्कम अद्याप अदा न करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पंढरपूर नगरपरिषदेला अनुदानाची रक्कम त्वरित मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-१२-२०२०) :** (१) पंढरपूर नगरपरिषदेस शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानामुळे व कोरोना कालावधीत नगरपरिषदेस करापोटी मिळणाऱ्या अपुऱ्या रक्कमेमुळे नगरपरिषदेच्या आर्थिक बाबींवर तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन/निवृत्तीवेतन यावर परिणाम होत असल्याची बाब मुख्याधिकारी, नगरपरिषद पंढरपूर यांनी निदर्शनास आणून दिली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) पंढरपूर नगरपरिषदेस देण्यात येणाऱ्या अनुदान रुपये ६,५२,५९,०००/- पैकी दिनांक २५/११/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये ५,००,००,०००/- इतके अनुदान वितरित करण्यात आले आहे. उर्वरित रुपये १,५२,५९,०००/- इतके यात्रा अनुदान सन २०१८-२०१९ मधील असल्याने ते आता देणे शक्य नाही.

पंढरपूर नगरपरिषदेस सहाय्यक वेतन अनुदान दरवर्षी देण्यात येते. कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेला ७ वा वेतन आयोग व त्या अनुषंगिक नगरपरिषदेची मागणी विचारात घेऊन सन २०२०-२०२१ या वर्षात आतापर्यंत रुपये २०,३५,८८,३२७/- इतके सहाय्यक अनुदान वितरित करण्यात आलेले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेंद्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.